**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज



**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी — ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ४३ | रविवार, दि. २३ मार्च २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


**रमजान २२**
आजचा इफ्तार : ६.४६
उद्याची सहेरी : ५.१८

# गुरुवर्य नारायणगिरीजी महाराजांचे स्वातंत्र्य लढ्यात योगदान

## महंत रामगिरी महाराज; नारायणगिरी महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव; सराला बेटावर भाविकांची गर्दी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर / वडाळा महादेव : सद्गुरू नारायगिरी महाराज यांनी आपल्या वाणीच्या माध्यमातून गावोगावी जाऊन लाखोंच्या संख्येने समाज सराला बेटावर जोडला. श्रध्दा व निष्ठा असेल तर संत आपल्या भक्तापर्यंत पोहोचवतात, विषयांचे विष संताच्या सानिध्यात निर्विष होते. संताचे जीवन परोपकारासाठी असते. संत तुकाराम, संत एकनाथ, रविदास, गाडगे बाबा, ज्ञानेश्वर, जनाबाई, मुक्ताबाई आदी संताचे जीवन संघर्षात गेले, सामाजिक कार्य करताना त्यांनी कधीच लोकनिंदा व स्वार्थ बघितला नाही. सद्गुरु ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांचे जीवन ही मानवी हितासाठी व बेटाच्या उत्कर्षासाठी संघर्षात गेले. निजामाच्या जोखाडातून मराठवाड्याला मुक्ती देण्यासाठी ब्रह्मलीन गुरुवर्य नारायणगिरीजी महाराज यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान हे खूप मोठे असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले .**

श्रीक्षेत्र गोदाधाम सराला बेटावर आज योगिराज गंगागिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांच्या १६व्या पुण्यतिथी उत्सवात आयोजित किर्तन प्रसंगी ''मार्ग देवुन गेले आधी, दया निधी संतते'' या संत निळोबा महाराज यांच्या अभंग रचनेचे विवेचन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले की, ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांना बालपणापासून अध्यात्माची आवड होती. अनेक महापुरुषांच्या जीवनात संघर्ष होता. सद्गुरुंनी संघर्ष करुन बेटाची व्याप्ती वाढवली. संकट ही एक संधी असते, जीवनात संकटात जो मात करतो तोच यशस्वी होतो.

संकटे ही जीवंत माणसाकडेच येत असतात मेलेल्यांकडे नाही. नारायणगिरी महाराज हे बेटाला व समाजाला मिळालेले एक रत्न होते,

> मी रामगिरी महाराज यांचा फॅन. पालकमंत्री संजयजी शिरसाठ महंत रामगिरी महाराज मी जे बोललो ते बोललो या धर्माच्या भुमिकेवर ठाम राहतात म्हणुन मी रामगिरी महाराज यांचा फॅन आहे, लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, नाम दार राधाकृष्ण विखे पाटील हे सराला बेटावर येणार असून भाविकांना सुखसुविधा कशी देता येईल याचा विकास आराखडा तयार करुन लवकरच तो पूर्ण करण्यात येईल असे शिरसाठ साहेब म्हणाले
>
> **– संजय शिरसाठ,** पालकमंत्री, श्रीछत्रपती संभाजीनगर

असे महंत रामगिरीजी महाराज म्हणाले. याप्रसंगी संभाजीनगर जिल्हयाचे पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, आमदार रमेश पा. बोरणारे, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर, माजी आमदार भाऊसाहेब



कांबळे, गोरक्षक मिलिंद एकबोटे, डॉ. दिनेश परदेशी, अविनाश गंलाडे, बाबासाहेब जगताप, बाबासाहेब चिडे, संदिप बारसे, डॉ. प्रकाश शेळके, डॉ. राजीव डोंगरे, भाऊसाहेब झिजुर्डे, रामदरबार आश्रमाचे हरिशरण महाराज, शिवगिरी आश्रमाचे संदिपान महाराज, थोरवाघलगाव आश्रमाचे विश्वनाथ गिरी महाराज, बाळासाहेब रंजाळे महाराज, रामभाऊ महाराज नादीकर, मुंदुगाचार्य संतोष सोळंकी, सराला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, पत्रकार भाऊसाहेब काळे, राजेंद्र देसाई, दत्तात्रय खपके यांच्यासह लाखोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते. संभाजीनगर, आहिल्यानगर, नाशिक जिल्ह्यातील २०० गावातून पुरणपोळ्या व मांडे आले. त्याच्याबरोबर १०, ००० लिटर दुधाचा महाप्रसाद भाविकांना देण्यात आला







कोल्हार : जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची सजविलेल्या गाडीतून ग्रामस्थांनी काढलेली मिरवणूक. दुसऱ्या छायाचित्रात ना. विखे यांचा ग्रामस्थांच्यावतीने नागरी सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित असलेले विविध मान्यवर तर तिसऱ्या छायाचित्रात ना. विखे पाटील यांना पुष्पहार अर्पण करताना कार्यकर्ते.

## संमिश्र

### सुप्रीम कोर्टाचे ५ न्यायाधीश मणिपूर दौऱ्यावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**इंफाळ** : सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांचा समावेश असलेले एक शिष्टमंडळ – न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती एमएम सुंदरेश, न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंह शनिवारी मणिपूरला पोहोचले. शिष्टमंडळाने चुराचंदपूर येथे मणिपूरमधील वांशिक हिंसाचाराच्या निर्वासितांची भेट घेतली. तसेच मदत छावण्यांना भेट दिली. यानंतर शिष्टमंडळ बिष्णुपूरमधील मोईरांग कॉलेजमध्ये पोहोचले.

### सरकारच्या आश्वासनामुळे म हिलांनी मतदान केले : ना. आठवले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छ. संभाजीनगर** : महायुतीने विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनामुळे राज्यातील लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु, यंदाच्या अर्थसंकल्पात त्याबाबत कोणतीही घोषणा न झाल्याने लाडक्या बहिणींची निराशा झाली आहे. २१०० रुपये न देण्यावरून विरोधकांकडून सरकारवर निशाणा साधला जात आहे. अशात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी या योजनेवर मोठे भाष्य केले आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणे अवघड आहे. मात्र, पुढच्या बजेटआधी लाडक्या बहिणींचे पैसे द्यावेत, अशी मागणी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.

### प्रशांत कोरटकर विरोधात लुकआउट नोटीस जारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटरकविराधोत कोल्हापूर पोलिसांनी लूकआऊट नोटीस काढली आहे.

## मुस्लिमांना डोळे दाखवणाऱ्यांना सोडणार नाही: अजित पवार

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई** : १७ मार्च रोजी नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर महाराष्ट्रात नेत्यांची वक्तव्ये सुरूच आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुस्लिम समुदायाला सुरक्षेचे आश्वासन दिले आहे.

अजित पवार म्हणाले की, जो कोणी मुस्लिम बांधवांना आव्हान देईल, तो दोन गटांमध्ये संघर्ष निर्माण करून कायदा आणि सुव्यवस्था बिघडेल आणि कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करेल. तो कोणीही असो, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही किंवा माफ केले जाणार नाही.

शुक्रवारी मुंबईतील इस्लाम जिम खाना येथे पक्षाने आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीत अजित पवार यांनी हे विधान केले. अजित पवार पुढे म्हणाले की, रमजान हा फक्त एका धर्मापुरता मर्यादित नाही. तो आपल्याला एकता आणि बंधुत्वाचा संदेश देतो. भारत विविधतेत एकतेचे प्रतीक आहे. छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि शाहू महाराज यांनी जातींना एकत्र आणून समाजाच्या उन्नतीचा मार्ग दाखवला. आपल्याला हा वारसा पुढे चालवायचा आहे. दुसरीकडे, मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला आहे की महाराष्ट्र सरकारने नागपूर हिंसाचाराचा तपास गुन्हे शाखेकडे सोपवला आहे.

## कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटविले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर घसरल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले होते. त्यातच केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क लावल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. मात्र, अखेर केंद्र सरकारने हा शुल्क हटवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२५ पासून होणार आहे. वित्त मंत्रालयाने परिपत्रक काढून याची अधिकृत घोषणा केली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी चांगला दर मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

सुमारे दीड वर्षांपूर्वी कांद्याचे वाढलेले दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क लागू केले होते. त्यानंतर शेतकऱ्यांच्या मागणीवरून हे शुल्क २० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले. मात्र, या शुल्कामुळे अपेक्षित प्रमाणात निर्यात होऊ शकत नव्हती, परिणामी कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरले होते. गेल्या काही दिवसांपासून कांदा उत्पादक शेतकरी यावरून नाराज होते आणि त्यांनी सरकारकडे वारंवार मागणी केली होती. ( २०२५)

कांद्याच्या कमी झालेल्या दरामुळे शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. मागील काही आठवड्यांपासून विविध ठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलन करून सरकारवर निर्यात शुल्क हटवण्याचा दबाव टाकला. अखेर त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत केंद्र सरकारने निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

## स्कूल बस व दुचाकीच्या अपघातात वृद्ध महिला ठार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोऱ्हाळे** : कोऱ्हाळे- शिर्डी बायपास रस्त्यावर अपघातांचे सत्र सुरू असतानाच कोऱ्हाळे गावाजवळील वाळकी फाट्यावर शुक्रवारी सकाळी लुना गाडी व श्रीगणेश शैक्षणिक संकुलाच्या स्कूल बसच्या अपघातात वाळकी येथील वृध्द महिला नाणुबाई तात्याबा पवार यांचा मृत्यु झाला आहे. शुक्रवारी सकाळी साडेसात वाजता श्रीगणेश संकुलाच्या विद्यार्थ्यांची बस कोऱ्हाळे बायपास मार्गे मुलांना घेऊन जात होती. वाळकी फाट्यावर आली असता वाळकी गावातील तात्याबा तुकाराम पवार हे पत्नी नानुबाई पवार यांना लुना गाडीवर घेवून रेशन भरण्यासाठी जात होते.

कोऱ्हाळे बायपास क्रॉस करत असताना अचानक समोरून



श्रीगणेश शाळेची पिवळ्या रंगाची स्कूल बस (क्रमांक १७ बी वाय ०२१८) अचानकपणे समोरून जोरात येऊन धडक दिली. त्यामुळे नानूबाई व पती तात्याबा हे रस्त्यावर खाली पडले. अपघात होताच दोघांनाही श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. याविषयी राहाता पोलीस ठाण्यात मयत महिलेचा मुलगा सखाराम तात्याबा पवार यांनी ही फिर्यादी दिली आहे. परंतु रुग्णालयात उपचारादरम्यान महिलेचा शनिवारी मृत्यू झाला. पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण व बीट हवालदार नरोडे हे करत आहे.

या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली असून लहान मुलांच्या जीविताशी धोकादायक असणाऱ्या बेदरकारपणे स्कूल बस चालवणाऱ्या वाहन चालकावर कडक करण्यात यावी अशी मागणी परिसरातून करण्यात येत आहे.

## संत समाजाचं भलं करतात: साध्वी सोनालीदिदी कर्पे

### कोपरगावमध्ये श्रीराम कथेचे गुंफले सहावे पुष्प

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : जीवन जगण्याची कला रामायणातुन मिळते, परमेश्वर आणि भक्त यांच्यातील संदेशचे वहन संत करतात, ते सम ाजाचं भलं करतात, संत ज्या ज्या ठिकाणी जातात तेथे अध्यात्म संस्काराचा पाया अधिक मजबुत होतो असे प्रतिपादन साध्वी सोनालीदिदी कर्पे यांनी केले.

शहरातील संत ज्ञानेश्वरनगरी तहसिल कार्यालय मैदानावर माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या तिस-या पुण्यतिथी निमीत्त कल्याणस्वामी संस्थान चकलंबा (गेवराई-बीड) अन्नपुर्णा माता मुलींची वारकरी शिक्षण संस्थेच्या संस्थापिका, साध्वी सोनालीदिदी कर्पे यांच्या रसाळवाणीतुन संगीतमय प्रभु श्रीरामकथेचे आयोजन करण्यांत आले असुन त्याचे सहावे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या. सौ. प्रिया व पियुष कोल्हे यांच्या हस्ते आरती, रामायणग्रंथाचे पुजन झाले.

प्रारंभी राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती रमेशगिरी महाराज, विश्वात्मक जंगलीदास माउली आश्रमाचे परमानंदगिरी महाराज, चांगदेव महाराज, अशोकानंद महाराज, सार्थकानंद महाराज, अनंतराज महानुभाव (सुरेगाव) आदि संत महंतांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांच्या हस्ते पुजन करण्यांत आले.

राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती प. पू. रमेशगिरी महाराज याप्रसंगी बोलतांना म्हणांले की, गेल्या तीन वर्षांपासुन या पंचक्रोशीतील भाविकांना सहकार महर्षी शंकरराव कोल्हे विचारधारा ट्रस्ट अध्यात्म ज्ञानाची शिदोरी देत आहे. कथा हया जीवनाच्या व्यथा दूर करतात यातुन अध्यात्म प्रबोधन होते. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचे समाजकार्य अनेकांना प्रेरणा देणारे आहे.

विश्वात्मक जंगलीदास माऊली आश्रमाचे प. पू.



परमानंदगिरी महाराज म्हणाले की, माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी अनेकांना जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. या भागात सहकाराच्या माध्यमांतुन शाश्वत विकासाला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले.

साध्वी सोनालीदिदी कर्पे पुढे म्हणाल्या की, पैठणच्या संत एकनाथांचे गुरू जनार्दन स्वामी होते, आणि कथास्थानावर राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रम ाचे मठाधिपती रमेशगिरी म हाराज आले हा अलौकीक योग आहे. मनुष्याने नेहमी सत्कर्म करावे. संत संगतीचा प्रभाव मतीमंदालाही हुशार बनवतो. रावणांने फसवुन वेशांतर करून साधुच्या रूपात सीतेचे हरण केले, शबरी भेट आदि प्रसंगावर साध्वी सोनालीदिदी कर्पे यांनी सखोल विवेचन केले. शिव तांडव नृत्याच्या झाकीने भाविकांना मंत्रमुग्ध केले. भगव्या वस्त्र परिधानाने भाविकांची उपस्थिती विशेष खुलून दिसत होती.

## शासनाच्या मालमत्तेचे नुकसान; चार जणांवर गुन्हा दाखल

जामखेड जामखेड तालुक्यातील खर्डा येथील शासकिय धान्यगोदाम, तलाठी कार्यालय व शासकीय दवाखाना या शासकीय इमारती पाडून तसेच सदरचे इमारतीवरील पत्रे, सागवानी दरवाजे, खिडक्या व सागवानी लाकडे व शासकीय मालमत्तेचा अपहार करुन नमुद सर्व शासकीय इमारती पाडुन अंदाजे २० लाख रुपयाचे नुकसान करुन सदर ठिकाणचे गाळेधारकांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत दहशत निर्माण करुन, जीवे मारण्याची धमकी देवुन त्यांचे गाळे जबरदस्तीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी चार जणांवर खर्डा पोलीस स्टेशनला गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असुन यामुळे खर्डा शहरात खळबळ उडाली आहे.

संग्राम शिरीष गोलेकर, जे.सी.बी.मालक सुमित सुधीर चावणे तिघेही रा.खर्डा ता.जामखेड व जेसीबी चालक तुकाराम आत्माराम सुरवसे रा.गवळवाडी ता.जामखेड या चार जणांविरोधात जामखेड तहसील कार्यालयाचे अतिरिक्त पुरवठा निरीक्षक तथा मंडळ अधिकारी विजय बापुराव चव्हाण (वय ५०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दि. १८ मार्च रोजी खर्डा येथील बसस्थानकासोर असलेल्या शासकिय धान्यगोदाम, तलाठी कार्यालय व शासकीय दवाखाना या शासनाची मालमत्ता असल्याचे माहित असतांनाही बंद गोडाउनचे कुलुप तोडुन त्यामद्ये प्रवेश करुन सदरचे इमारतीवरील पत्रे, सागवानी दरवाजे, खिडक्या व सागवानी लाकडे काढुन नेले आहेत.

# खा. लंके यांची येरेकरांच्या विरोधात तक्रार

## सतत अनुपस्थितीबाबत गांभीर्याने तपास करण्याची मागणी; मुख्य सचिव सैनिक यांच्याकडे तक्रार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांची कार्यालयातील अनुपस्थिती वारंवार निदर्शनास येत असून त्यांच्या या अनुपस्थितीचा गांभीर्याने तपास करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे



पत्राद्वारे केली आहे.

मुख्य सचिवांना पाठविण्यात आलेल्या पत्रात खा. लंके यांनी म्हटले आहे की, येरेकर यांची कार्यालयातील अनुपस्थिती वारंवार निदर्शनास येत आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे कार्यप्रणालीवर आणि जिल्हा परिषदेच्या कामकाजावर वितरीत परिणाम झाला आहे. येरेकर यांच्या सततच्या अनुपस्थितीतमुळे अनेक सामन्य नागरीकांची प्रशासकीय कामे प्रलंबित राहिली आहेत.

यासंबंधी अनेक नागरिकांनी आपल्याकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. येरेकरांच्या अनुपस्थितीमुळे महत्वाचे निर्णय घेताना विलंब होत असून त्याचा कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे खात्र. लंके यांनी पत्रात नमुद केले आहे.

### महिन्यात फक्त दोनदा ३४ मिनिटे उपस्थिती

अहिल्यानगर येथील जिल्हा परिषदेच्या सीईओ दालनातील फेब्रुवारी महिन्याचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सीईओ येरेकर हे २४ फेब्रुवारी रोजी दोन मिनिटे व २५ फेब्रुवारी रोजी ३२ मिनिटे दालनात उपस्थित असल्याचे दिसत आहे. इतर दिवशी ते पुर्णपणे अनुपस्थित असल्याचे दिसत आहे. दरम्यान येरेकरांच्या दालनातील सीसीटीव्ही फुटेज खा. लंके यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविले आहे.

### आवश्यक ती कारवाई करावी

जिल्हा परिषदेच्या कामकाजात नियमितता आणण्यासाठी त्वरीत उपाययोजना केल्या जाव्यात तसेच या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी खा. लंके यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे केली आहे.

# सावकाराच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील निमगावजाळी येथील शेतकरी प्रकाश भाऊसाहेब जोंधळे (वय ४५) जमिनीच्या वादातून विष घेऊन आत्महात्या करण्याचा प्रयत्न झाला असुन सदर घटना ही गुरुवारी दि. २० मार्च रोजी घडली होती. उपचारासाठी जोंधळे यांना दवाखान्यात दाखल केले असुन प्रकृती ही चिंता जनक असल्याची माहिती पत्नी वैशाली प्रकाश जोंधळे यांनी दिली.

सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दोन दिवसापूर्वी शेतकरी जोंधळे यांनी तहसीलदार निवेदन देऊन आमच्या कुटुंबाला आत्मदहन करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. याबाबत सविस्त माहिती अशी की, प्रकाश भाऊसाहेब जोंधळे यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले होते की, वैयक्तिक अडचणीमुळे त्यांनी सावकार भाऊसाहेब भिकाजी ढोणे (रा. दाढ बुद्रुक, ता. संगमनेर), मच्छिंद्र रखमाजी थेटे (रा. निमगवजाळी, ता. संगमनेर) या सावकाराकडून साठे खरेदीच्या करारानुसार जमीन तारण ठेवून कर्ज घेतले होते. कर्ज व व्याजाची रक्कम परत करणे ही सावकाराने परस्पर जमीन विकली. त्या जागेवर अनेक दिवसापासुन केस चालू असताना प्रशासनाने सावकाराच्या बाजूने पोलीस बंदोबस्त देत कंपाऊंड करण्याचे आदेश दिले. त्यामुळे आपल्या कुटुंबाला जगणे कठिण होणार असल्याचे जोंधळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### पोलीसांच्या भूमिकेकडे लक्ष?

याप्रकरणी पोलीस काय भूमिका घेणार? याकडे लक्ष लागल्या आहे संबंधित वर कारवाई होणार की जमीन प्रकरणे न्याय प्रविष्ट असता नाही अधिकार्यांनी आदेश देणे योग्य होता का? याबाबत चर्चा सुरू आहे.

### यांना जबाबदार धरा

जोंधळे यांनी लिहिलेल्या सुसाईट नोटवर आपल्या आत्महातेस मच्छिंद्र रखमाजी थेटे, भाऊसाहेब भिकाजी ढोणे, विकास शिवाजी ढगे तसेच तहसिलदार व उपविभागिय अधिकारी संगमनेर यांना जबाबदार ठरवण्यात यावे.

# गोरक्षनाथ दिंडीच्या वतीने हरिनाम सप्ताह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील मांजरसुंभा मधील गोरक्षनाथ दिंडी सोहळा ट्रस्टच्या वतीने पंढरपूर येथे चैतन्य गोरक्षनाथ मंदिर बांधण्यात आले त्याचा १६ वा वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह,श्री स्वामी समर्थ ग्रंथ पारायण सोहळा वै.बाळकृष्ण महाराज यांच्या कृपाशिर्वादाने ॐ चैतन्य गोरक्षनाथ दिंडी सोहळा ट्रस्ट व संस्थापक अध्यक्ष कै. दादासाहेब जाधव यांच्या अथक परिश्रमातून व राम महाराज पोते व वै.गोरक्षनाथ महाराज ढोकणे यांच्या अधिपत्याखाली व पंचक्रोशितील सर्व भाविकांच्या सहकार्याने दि. २४ ते २७ मार्च या कालखंडात ॐ चैतन्य गोरक्षनाथ मंदिर,रेल्वे लाईनचे पश्चिमेस,शिंदे नाईक मळा,पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला आहे तरी चैतन्य गोरक्षनाथ गड पंचक्रोशितील व सर्व नाथ भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.




# २५ मार्चपासून समर्थ बाबुराव महाराज यात्रोत्सव

## यात्रेनिमित्त देवळाली प्रवरात धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी फॅक्टरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान श्री समर्थ बाबुराव पाटील महाराज यांचा यात्रा उत्सव मंगळवार २५ ते शनिवार २९ मार्च २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार असून यानिमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची महिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष डॉ. विश्वास पाटील यांनी दिली



आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही यात्रा उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली असून दिल्ली व अजमेर येथील आकर्षक रहाट पाळणे, खेळणी, विविध वस्तू व खाऊ गल्ली हे यात्रेचे खास वैशिष्ट्य आहे. यात्रा उत्सवानिमित्ताने २५ मार्च रोजी सकाळी १० ते १२ समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे कीर्तन होणार आहे.

यात्रेसाठी समाजातील विविध दानशूर मंडळी,संस्था, देवळाली प्रवरा नगरपरिषद, महसूल प्रशासन पोलीस, होमगार्ड, माजी सैनिक यांचे सहकार्य लाभणार आहे. यात्रेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वंशज संजय पाटील, कार्याध्यक्ष शुभम पाटील, मेजर राजेंद्र कडू, नारायण कडू, गणेश भांड, तुळशीराम कडू, जालिंदर मुसमाडे, सतीश वांळुज, अनिल ढुस, धनंजय शिंदे, दिपक पठारे, भारत शेटे, सुखदेव होले, शिवराम कडू, बापू कडू, संदिप कडू, राजेंद्र पोकळे, मुस्ताक शेख, सचिन सरोदे, रंगनाथ होले, अशोक शिंदे आदिंसह सदस्यांनी केले आहे.

# साड्यांच्या वेगवेगळ्या कलेक्शनसाठी महिला चोखंदळ : पार्वती जगताप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** साडी आणि साड्यांची खरेदी हा महिलांचा आवडीचा विषय. एखाद्या समारंभात किंवा प्रवासातही महिला आपल्या साडीबरोबरच अन्य महिलांच्या साड्यांवर आवडीने चर्चा करतात. मग साड्यांचे वेगवेगळे कलेक्शनसाठी ती चोखंदळ राहून साडी निवडत असते. धार्मिक परीक्षा बोर्ड येथे भरविण्यात आलेले साड्यांचे प्रदर्शन महिलांसाठी पर्वणी ठरणार असल्याचे प्रतिपादन पार्वती जगताप यांनी केले.



पुष्कर येथील एपिक्स साडीच्या वतीने जैन धार्मिक परीक्षा बोर्ड समोर ८ दिवसीय साडी प्रदर्शनाचे उद्घाटन पार्वती जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, रेणुका मल्टीस्टेटच्या संचालिका जयंती भालेराव, नम्रता दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, एपिक्स साडीचे पियुष जैन, सुरेखा जंगम, रेखा मैड, सुरेखा चेमटे, नंदा पुरोहित, श्रद्धा उपाध्ये, उषा सोनी, अलका वाघ, जयश्री पुरोहित, सुनिता काळे, रेखा तिवारी, उषा सोनटक्के, मीनल बोरा, अरुणा गोयल, सुजाता पुजारी आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# डॉ. एपीजे अब्दुल कलाम ग्रामगौरव पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य, कला, क्रीडा, शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उत्कृष्ट काम करणाऱ्या नगर जिल्ह्यातील स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेला जळगाव येथील टी.एन. हेल्प मल्टिपर्पज सोसायटीच्या वतीने माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम ग्राम गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जळगाव येथे १३ एप्रिल रोजी संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख यांनी दिली.

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था नगर तालुक्यासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरु आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध कार्यक्रम घेऊन संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी मोठी जनजागृती केली आहे.

# छत्रपती अभियांत्रिकीमध्ये 'नॅशनल' कॉन्फरन्स

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये येत्या २६ आणि २७ मार्च रोजी इन्वेंशन्स अँड इनोव्हेशन्स इन सायन्स अँड टेक्नॉलॉजी या मेगा इव्हेंट अंतर्गत २५ प्रकारच्या विविध टेक्निकल स्पर्धांच आयोजन करण्यात आले असून या स्पर्धांसाठी आत्तापर्यंत ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ही जवळपास ५४० च्या पुढे झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी दिली.

या स्पर्धा अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, सायन्स, फार्मसी, या सर्व शाखांसाठी उपलब्ध असून राष्ट्रीय पातळीवरची पेपर प्रेझेंटेशन ही कॉम्पिटिशन अशा सर्वांसाठी असणार आहे की, जे सायन्स आणि टेक्नॉलॉजी मधील वेगवेगळ्या विषयांवर नवनवीन संशोधन करून आपली नवीन संकल्पना जगासमोर मांडू इच्छितात.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष मा. रा. ह. दरे, डॉ. विवेक भापकर साहेब, ड. विश्वासराव आठरे, जयंत वाघ, खजिनदार ड. दीपलक्ष्मी म्हसे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाविद्यालयाच्या वेबसाईटवर 'आय स्क्वेअर एस टी' या इव्हेंटची सर्व माहिती आणि नोंदणी प्रक्रिया दिलेली आहे. या मेगा इव्हेंटसाठी विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करू शकतात त्याचबरोबर २६ आणि २७ मार्च रोजी नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय या ठिकाणी सकाळी ठीक १० वाजता उपस्थित राहून ऑफलाइन पद्धतीने देखील नाव नोंदणी करू शकतात.

सहभाग नोंदवताना कुठलीही अडचण आल्यास पुढील कॉन्टॅक्ट नंबर आणि कॉन्टॅक्ट पर्सन ला तात्काळ कॉल करा. प्राध्यापक मोहनेश मांढरे ८१४९९९४०९८ आणि प्राध्यापक ऋषीकेश रोहमारे ७७०९९४५७९२.

# महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी उपक्रम गरजेचे : देशमुख

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर युनियन बँक ऑफ इंडिया, जयहिंद महिला मंच आणि सह्याद्री महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आर्थिक साक्षरता या विषयावर शर्मिला देशमुख यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.



या व्याख्यानात त्यांनी महिलांसाठी आर्थिक स्वावलंबन आणि साक्षरतेचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमाला माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात उपस्थित होते. त्यांनी महिला भगिनींसोबत संवाद साधला. आर्थिक स्वायत्तता आणि महिलांच्या सबलीकरणासाठी आर्थिक ज्ञानाचे महत्त्व आधोरेखित केले.

या उपक्रमांमुळे महिलांमध्ये आर्थिक साक्षरतेबाबत जागरूकता निर्माण होते आणि त्यांना सक्षम होण्यासाठी प्रेरणा मिळेल. महिलांच्या उज्वल भविष्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक सबलीकरणासाठी अशा उपक्रमांची अधिकाधिक गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# २५ मार्च रोजी विभागीय डाक अदालतीचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पोस्टाच्या कार्यपद्धती विषयी किंवा काम काजाबद्दल तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसलेल्या तक्रारींच्या निवारणासाठी अधीक्षक डाकघर, हेड पोस्ट ऑफीस, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात २५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता विभागीय डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या डाक अदालतीमध्ये टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, डाक वस्तू, पार्सल, बचत बँक व मनी ऑर्डर बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार आहेत.

# कोपरगाव पत्रकार संघाकडून नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा सन्मान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कोपरगाव यांच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त कोपरगाव नगरपालिकेच्या महिला अधिकारी, सफाई महिला कर्मचारी व समृद्धी शहर स्टार अंतर्गत बचत गटाच्या महिलांचा राज्य संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव मुंडे व जिल्हाध्यक्ष सोमनाथ काळे तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेच्या सभागृहात नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल, अश्विनी पिंगळ, मनीषा ढवळे, सुनील आरणे, रामनाथ जाधव, राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष जनार्दन जगताप, स्वप्निल कोपरे, विजय कापसे, रवी वाघडकर, अनिल दीक्षित, अक्षय काळे आदींच्या प्रमुख उपस्थितीत सर्व महिलांना सन्मानपत्र, गुलाब पुष्प व भेटवस्तू देत सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे तालुकाध्यक्ष जनार्दन जगताप यांनी करत संघटनेच्या कार्याची माहिती सांगितली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कापसे यांनी केले. याप्रसंगी रश्मी प्रधान, कविता सोनवणे, रोहिणी जाधव, रूपाली भालेराव, नेहा मिटके, रत्नप्रभा अमोलीक, मीना कदम, प्रचिती गोसावी आदी उपस्थित होत्या.

# अहिल्यानगरमध्ये स्वच्छतेचा नवा अध्याय

## सलग ६५ आठवडे यशस्वी स्वच्छता मोहिम



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याच्या दृष्टिकोनातून महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणारी स्वच्छता मोहीम शनिवार, २२ मार्च रोजी चांदणी चौक ते कोठी चौक या परिसरात यशस्वीरित्या पार पडली.

स्वच्छता विशेष मोहिमेअंतर्गत जेसीबी, ट्रॅक्टर, जेटिंग मशीन सहाय्याने दुभाजका जवळील माती, प्लॅस्टिक कचरा तसेच गटारींमध्ये साचलेला कचरा पूर्णपणे काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांसह विविध सामाजिक संस्था, स्थानिक नागरिक, तसेच व्यापारी संघटनांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली ही स्वच्छता मोहीम आजपर्यंत सलग ६५ आठवडे सातत्याने राबविली जात आहे. दर शनिवारी शहरातील विविध भागांमध्ये ही मोहीम हाती घेतली जाते, ज्यामुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ राहण्यास मदत होत आहे.

### महानगरपालिकेचे विशेष आभार

महानगरपालिकेच्या वतीने या मोहिमेत सहभाग घेतलेल्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे, सामाजिक संस्थांचे, व्यापारी वर्गाचे आणि नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले असून, भविष्यातही हे अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या वतीने शहरवासीयांना आपल्या परिसरात स्वच्छता राखण्याचे आणि या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा.

**– यशवंत डांगे, आयुक्त**

या मोहिमेद्वारे फक्त कचरा उचलण्याचे कार्यच नव्हे, तर नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यावरही भर दिला जात आहे. प्लास्टिकचा कमी वापर, कचऱ्याचे योग्य विलगीकरण, आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याच्या महत्वाविषयी जनजागृती करण्यात आली.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : **महेश पोपट रक्ताटे**. पोस्टल परवाना क्र. SRP/139/2023-2026/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/139/2023-2026 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# संत साहित्याने समाजाची विषमता दूर केली

## पालकमंत्री विखे पाटील; भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : संत साहित्य केवळ धर्मापुरते आणि भक्तीपुरते सिमीत नाही तर, समाजाच्या उध्दाराकरीता उपयुक्त ठरले आहे. या संत साहित्याने समाजामध्ये सत्व आणि तत्व रुजवितानाच समाजाला सत्य सांगून विषमता दूर करण्याचे मोठे काम केले असल्याचे गौरद्गार १३ व्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या १३ व्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्याप्रसंगी राज्यातून आलेल्या संत साहित्य क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधून मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या संमेलना मागील भूमिका विषद केली. वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, जेष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे, संमेलनाचे नुतन अध्यक्ष संजय महाराज देहूकर, मावळते अध्यक्ष माधव महाराज शिवडीकर यांच्यासह राज्यातून आलेले वारकरी आणि संत साहित्याचे अभ्यासक याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, संतांनी भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर मध्ये १३ वे संत साहित्य संमेलन व्हावे हा आमच्या दृष्टीने फार मोठा अभिमान आहे. या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात असलेले अध्यात्मिक ठिकाण हे आम च्या दृष्टीने मोठी उपलब्धी असल्याचे स्पष्ट करुन, या अध्यात्मिक दृष्टीचा प्रेरणास्त्रोत हा पंढरपुरचा पांडुरंग आहे. देहू आळंदी तिर्थस्थान संत धर्माची लोक विद्यापीठं आहेत. सम ाजाच्या प्रत्येक स्तरातून संतरुपे व्यक्त झाली. त्यांनी त्यांच्या जीवनातून साधूत्वाचे उद्दात आदर्श प्रगट केले. संतांच्या या कार्यातूनच भक्तीरुप अवतरले असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष ह.भ.प संजय महाराज देहूकर, ह.भ.प माधव महाराज शिवडीकर व डॉ.सदानंद मोरे यांचीही भाषण झाली. वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील यांनी प्रास्ताविक केले. संमेलनाच्या उद्घाटनापुर्वी श्री.साईबाबा मंदिर ते संमेलन स्थळापर्यंत वारकरी दिंडी काढण्यात आली. दोन दिवस चालणाऱ्या परिषदेला राज्यातील वारकरी आणि संत साहित्याचे अभ्यासक उपस्थित राहणार आहेत.




### साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे

संतानी सर्वसामान्यांसाठी लिहीलेल्या साहित्यांमध्ये उत्कर्षाची दिशा सापडते. समाजाच्या प्रश्नांची उत्तरही मिळतात. त्यामुळेच त्यातील वैशिष्ट्य शोधण्यासाठी का होईना संत साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या संत साहित्याने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पाया मजबुत करतानाच स्त्रिवादी दृष्टीकोनही स्पष्ट केला. त्यामुळेच संत मुक्ताबाई आणि संत जनाबाई यांच्या उल्लेखाशिवाय वारी पुर्णत्वाला जावू शकत नाही. त्याच प्रमाणे संत गाडगे महाराज आणि संत तुकडोजी महाराज यांनी समाज आणि गाव सुधारणेचा मंत्र हा निद्रिस्त समाजाला जागे करण्यासाठी उपयुक्त ठरला असल्याचे त्यांनी सांगितले.

### वारकऱ्यांनी सामाजिक प्रबोधन करावे

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी आपल्या भाषणात संताच्या विचारांचा वारसा घेवून वारकरी काम करतात. माणसांचे कल्याण व सुखदूखासाठी जगण्याचा मंत्र वारकरीच देतात. वारकरी संप्रदायात महिलांची संख्या लक्षणीय आहे. महिलांवर होणाऱ्या वाढत्या अत्याचाराचे प्रमाण लक्षात घेवून सामाजिक प्रबोधनासाठी वारकऱ्यांनी अधिक पुढाकार घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# निमगाव वाघाच्या ग्रामस्थांची आरोग्य तपासणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ग्रामीण भागाच्या वाडी-वस्तीवरील ग्राम स्थांना आरोग्य सुविधा मिळण्यासह केंद्र आणि राज्य सरकारच्या आरोग्यासंबंधी असलेल्या योजनेची माहिती देण्यासाठी निमगाव वाघा (ता. नगर) येथे मोफत आरोग्य शिबिर व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पाईपलाईन रोड येथील प्राईम केअर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आणि एकता फाऊंडेशनच्या माध्यम ातून घेण्यात आलेल्या या शिबिरास गावातील ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची माहिती देण्यात आली.

या शिबाराप्रसंगी डॉ. उल्हास राठोड, ब्रदर रोहिदास लबडे, रवी सोनवणे, प्रवीण शिंदे, उपसरपंच किरण जाधव, माजी सरपंच अनिल डोंगरे, एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा सोसायटीचे सदस्य अतुल फलके, विजय गायकवाड, संदीप गायकवाड, संभाजी पाचारणे, अनिल रक्ताटे, नवनाथ फलके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ. उल्हास राठोड म्हणाले की, ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने आरोग्याच्या योजना पोहचण्याची गरज आहे. आरोग्यासह शासनाच्या आरोग्यासंबंधी असलेल्या योजनांची त्यांना माहिती झाल्यास त्याचा त्यांना लाभ घेता येणार आहे. आर्थिक अडचणीमुळे गंभीर आजार असताना देखील ग्रामस्थ उपचारासाठी पुढे येत नाही. मात्र प्रधानमंत्री व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून सर्व शस्त्रक्रिया व उपचार मोफत होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

# स्व. शंकरराव कोल्हे यांची उद्या जयंती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांची जयंती २४ मार्च रोजी असून त्या दिवशी प्रेरणा दिवस साजरा करण्याचा संकल्प श्री गणेश कारखाना व श्री गणेश विद्या प्रसारक मंडळाने केला आहे. चेअरमन, व्हा. चेअरमन सर्व संचालक अधिकारी कर्मचारी व विद्या प्रसारकचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर सहकारी यांच्या वतीने हि माहिती देण्यात आली आहे.

सर्व स्तरातील घटकांसाठी अफाट कार्य करणाऱ्या माजी मंत्री स्वर्गीय शंकरराव कोल्हे यांच्या जीवनातील आदर्श कार्याची शिकवण नव्या पिढीसमोर प्रेरणा बनून उभी आहे. त्यांच्या जयंती निमित्त कारखाना परिसरात प्रतिमापूज, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण करण्यात येणार आहे.यास गणेश विद्या प्रसारक संकुलात विद्यार्थ्यांच्या कल्पक विचारांना वाव देण्यासाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वृक्षारोपण करण्यात येईल आणि स्व.कोल्हे यांच्या जीवन चरित्रावर विचार व्यक्त केले जाणार आहे.

गणेश परिसराची कामधेनु समजल्या जाणाऱ्या गणेश कारखान्याच्या जडणघडणीत मोठे योगदान त्यांचे आहे. कोपरगाव मतदारसंघाची पूर्वीची व्याप्ती लक्षात घेता गणेश परिसराचा बहुतेक भाग हा स्व.कोल्हे साहेब यांच्या नेतृत्वात काम करत होता. अनेक पिढ्यांना ऊर्जा देण्याएवढे व्यापक कार्य त्यांचे आहे.२४ मार्च हा दिवस प्रेरणा दिवस साजरा करून अनोखी आदरांजली अर्पण केली जाणार आहे.

स्व.कोल्हे यांचे गणेश परिसरातील नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविण्यात मोठे योगदान राहिले आहे. त्यांनी जोडलेला कार्यकर्त्यांचा समूह त्यांच्या पश्चात स्मरण म्हणून त्यांनी समाजविकासाचा घालून दिलेल्या मार्गाने प्रवास करत आहेत. जीवनात सकारात्मक पाऊल टाकण्यासाठी प्रेरणा म्हणून कोल्हे यांचे व्यक्तिमत्व आणि जीवनचरित्र आदर्शवत आहे.



# प्राप्त निवेदनांवर कार्यवाही करावी

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा.; प्रवरानगर येथे जनता दरबार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर** : नागरीकांकडून प्राप्त होत असलेल्या निवेदनाबाबत वरीष्ठ अधिकार्यांनी गांभीर्याने कार्यवाही करावी. गाव पातळीवरील सार्वजनिक प्रश्न आणि नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी आता पंधरा दिवसांनी सर्व विभागाचा आढावा घेणार आहोत. त्यादृष्टीने निर्धारीत वेळेत नागरीकांचे अर्ज निकाली काढण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मंत्री विखे पाटील यांनी प्रवरानगर येथील डॉ. धनंजयराव गाडगीळ सभागृहात जनता दरबाराच्या माध्यमातून मतदार संघातील आणि जिल्ह्यातील नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्राप्त अर्जावर तातडीने कार्यावाही होण्याच्या दृष्टीने त्यांनी संबधित विभागातील अधिकार्यांशी संपर्क साधून समस्या मार्गी लावण्यासाठी प्राधान्याने लक्ष देण्याच्या सूचना दिल्या.

यापुर्वी जिल्हा स्तरावर वीज वितरण कंपनी परीवहन आणि जलसंपदा विभागांचा आढावा आपण घेतला आहे. अधिवेशन संपल्यानंतर सार्वजनिक वितरण व्यवस्था, जलसंधारण आणि कौशल्य विकास कार्यक्रमाचा आढावा आपण घेणार असल्याचे सांगून, बैठकीत दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाली की नाही? याचा आढावा आता दर पंधरा दिवसांनी आपण घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून सर्व विभागांनी व्यक्तिगत योजनांचे लाभ तसेच सार्वजनिक उपक्रमाबाबत अतिशय संवेदनशील राहून काम करण्याचे निर्देश मंत्री विखे यांनी दिले आहेत.

### प्रत्येक तालुक्यात बैठक घेणार

मंत्रालय स्तरावर प्रलंबित असलेल्या जिल्ह्यातील तसेच सर्व विधानसभा कार्यक्षेत्रातील प्रकल्प योजनांची अंमलबजावणी आणि नव्याने सुरू करायाच्या सार्वजनिक कामा बाबत सर्व आमदारांच्या समवेत मंत्रालयात आमदार आणि वरीष्ठ अधिकारी यांच्या समवेत बैठक घेतली. या बैठकीत झालेल्या निर्णयाचा पाठपुरावा करण्यासाठी आता प्रत्येक तालुक्यात आमदारांच्या पुढाकारने समन्वय बैठक घेवून प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे विखे पाटील म्हणाले.

# ..अन्यथा सरकावर फसवणुकीचा गुन्हे दाखल करणार : ॲड. अजित काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शेतकरी कर्जमाफीबाबत विधानसभा निवडणुकीत राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांची सातबारा वरील संपूर्ण कर्जमुक्तीबाबत आश्वासित केले होते. परंतु याबाबतचा विसर सोयीस्कररित्या राज्य सरकारला काल सादर केलेल्या अर्थसंकल्पात दिसून आला. त्यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्हा सत्र न्यायालयात शेतकरी सरकारमधील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यावर शेतकऱ्यांची फसवणूक केले कामी भारतीय दंड विधान कलम ४२० अन्वये फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात येतील, असाही इशारा देऊन कायदेशीर न्यायालयीन आंदोलन करणार असल्याचे ॲड. काळे यांनी सांगितले.

सदर बैठकीस जिल्हाध्यक्ष अनिल औताडे तालुका अध्यक्ष युवराज जगताप हे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीचे औचित्य साधून कर्जमुक्ती अभियानास जनजागृतीची सुरुवात झाली. १८ मार्च पर्यंत अहिल्यानगर जिल्ह्यात जास्तीत जास्त गावांमध्ये जाऊन सभा घेतल्या. सदर सभांमधून शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी सरकारवर प्रचंड भडिमार केला. शेतकरी नेत्यांच्या आक्रमक व वस्तुनिष्ठ भाषणांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती होऊन १९ मार्चला सेंट्रल बिल्डिंग कृषी आयुक्त व साखर आयुक्त कार्यालयात हजारो शेतकऱ्यांचा आक्रोश बघायला मिळाला.

पुणे येथे महसूल ,कृषी, साखर आयुक्त कार्यालयात राज्यातील विविध जिल्ह्यातून स्वयंस्फूर्तीने शेतकरी आले होते. या आंदोलनाचे मार्गदर्शक रघुनाथ दादा पाटील व नेतृत्व एडवोकेट अजित काळे यांनी केले. सदर आंदोलनाप्रसंगी माननीय रघुनाथ दादांनी १४ एप्रिल पासून शहरांकडे जाणारा शेतकऱ्यांचा दूध, फळे, भाजीपाला, साखर रोखण्याचा इशारा दिला.

श्रीरामपूर शासकीय विश्रामगृह येथे शेतकरी कर्जमुक्ती प्रश्नावर झालेल्या पत्रकार परिषदेत प्रमुख नेते ॲड काळे, जिल्हाध्यक्ष अनिलराव औताडे, ता. अध्यक्ष युवराज जगताप, डॉ. आदिक, सुदामराव औताडे, साहेबराव चोरमल, कडू पवार, गोरख पवार, एडवोकेट सर्जेराव घोडे, राजेंद्र लांडगे, नरेंद्र काळे, दादासाहेब साबदे, बापूसाहेब देशमुख, भाऊसाहेब काळे आधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिक्रमण हटविण्याबाबत स्थगितीचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : घोडेगाव-कुकाणा राज्य मार्ग क्रमांक ६६ च्या रुंदीकरणासाठी चांदा (ता. नेवासा) येथील रस्त्याचे अतिक्रमण हटविण्याबाबत सार्वजनिक बांधकाम उपविभागाने दिलेल्या नोटीसला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगितीचे आदेश दिले.


चांदा (ता. नेवासा) येथील घोडेगाव-कुकाणा राज्य मार्ग क्रमांक ६६ रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम उप विभागाने रस्त्याच्या जवळ राहणारे रहिवासी व व्यावसायिक यांना अतिक्रमण काढण्यासाठी १० फ ेब्रुवारी रोजी नोटीस दिली होती. सदर नोटीस विरोधात चांदा येथील मालमत्ता धारक मुंतजीर राजू शेख व कालू लालू शेख यांनी ॲड. श्रीनिवास एस. वाघ यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर याचिकाकर्ते यांचे म्हणणे ऐकून उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मंगेश पाटील व न्यायाधीश वाय.जी. खोब्रागडे यांनी १९ मार्च रोजी अतिक्रमण नोटीसला स्थगितीचे आदेश पारित केले आहे.

# नगरपरिषद शास्तीकरासंदर्भात लवकरच बैठक

## ना. एकनाथ शिंदे यांचे आमदार खताळ यांना आश्वासन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर शहरातील अनेक मालमत्ता धारकांना अनधिकृत बांधकामांचे कारण सांगत नगरपरिषदेकडून शास्तीकर व २ टक्के व्याजासह मोठी रक्कम भरण्याच्या नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. हा कर आणि दंडाची रक्कम सर्व सामान्य नागरिकांना भरणे कठीण आहे. त्यामुळे राज्य शासनाने हा शासकीय माफ करावा अशी मागणी आमदारांवर खताळ यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. त्यावर लवकरच याबाबत बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेणार असल्याचाविश्वास मंत्री शिंदे यांनी आ. खताळ यांना दिला.



संगमनेर शहरातील अनेक कष्टकरी कुटुंबे, ज्यांनी आपल्या आयुष्यभराच्या कमाईतून छोट्या-मोठ्या जागा घेतल्या. आपल्या हक्काचं घर उभारले आहे. आज त्यांच्यावरती अन्यायकारक शास्तीकर व दंडाचा बोजा टाकला जात आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना या शास्ती करातून सूट मिळावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे केली आहे. अनेक दिवसांपासून जनता दरबारमध्ये शहरातील नागरिक शास्ती संबंधी प्रश्न घेऊन येत निवेदन देत होते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन लवकरच निर्णय घेण्यासाठी शासनाने एक समिती गठीत केली आहे या समि तीच्या अहवालानंतर लवकरच यावर निर्णय घेण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# देवगडला हजारो वारकऱ्यांची मांदियाळी

## समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या ४२ व्या पुण्यतिथी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड येथे श्री गुरूदेव दत्त पिठाचे निर्माते श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या ४२ व्या पुण्यतिथी निमित्ताने देवगड येथे शेकडो दिंडयांनी हजेरी लावून भगवान दत्तात्रयांसह श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या पुण्यतिथी सोहळयाचा शनिवारी दि. २२ मार्च रोजी मुख्य दिवस असल्याने पहाटेच्या सुमारास वेदमंत्राच्या जयघोषात महंत भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांसह श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या मुख्य मूर्तीस अभिषेक घालण्यात आला. यावेळी किसनगिरी विजय ग्रंथाचे पारायण करण्यात आले.याप्रसंगी मंदिर प्रांगणात अहिल्यानगर व संभाजीनगर जिल्हयातून आलेल्या शेकडो दिंड्यांचे महाराजांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले.

'श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा की जय, 'अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त' असा नामघोष करत दिंडयांचे आगमन येथे झाले. भागवत धर्माची पताका खांद्यावर घेतलेले वारकरी, झेंडेकरी, टाळ मृदुंगाच्या गजरात भजने गाणारे भजनी मंडळे, पुष्पांनी सजविलेला पालखी रथ, डोक्यावर तुळशी कलश घेतलेल्या बालिका युवती व महिला व त्यामागे पुरुष व महिला भाविक असे दिंड्यांचे स्वरूप होते. आलेल्या शेकडो दिंड्यांच्या आगमन प्रसंगी मंदिर परिसरातील वातावरणात मंगलमय बनले होते.

दुपारच्या सत्रात झालेल्या आरती प्रसंगी मंजूर येथील महंत श्री शिवानंदगिरीजी महाराज, भास्करगिरी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज,महंत सुनीलगिरीजी महाराज यांच्या हस्ते भगवान दत्तात्रयांसह श्री सम र्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या मूर्तीचे पूजन करत महाआरती करण्यात आली.

यावेळी झालेल्या आरती सोहळयाच्या प्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे,संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग,माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे,उद्योजक प्रभाकर शिंदे, बाळासाहेब शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### किसनगिरी बाबांची चरित्र कथा

श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या ४२ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने श्री क्षेत्र देवगड येथे भास्करगिरी बाबांच्या व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंद गिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी दि.२२ ते २७ मार्च या सहा दिवसांच्या कालावधीत युवा कीर्तनकार हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांची दोन सत्रात चरित्र कथा सादर होत असून रात्रीच्या किर्तन महोत्सवात नामवंतांची कीर्तने होत आहेत.

# महापालिकेतील बेफिकीरीकडे खा. लंके यांनी वेधले लक्ष

## आयुक्तांशी पत्रव्यवहार; जन्म, मृत्यू प्रमाणपत्र विभागातील कर्मचाऱ्यांचा बेफिकीरपणा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेच्या जन्म व मृत्यू प्रमाणपत्र कर्यालयातील नागरिकांना होणारा प्रचंड त्रास हा अत्यंत गंभीर आणि असहाय्य झाला असून या कार्यालयातील दिरंगाई, बेफिकीरपणा आणि कर्मचाऱ्यांच्या उध्दट वर्तनात त्वरीत सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशा मागणीचे पत्र खा नीलेश लंके यांनी महापालिकेच्या आयुक्तांना दिले आहे.

या पत्रामध्ये खा. लंके यांनी नमुद केले आहे की, नगर शहरात मोठया प्रमाणावर जन्म, मृत्यूची नोंद होत असल्याने शहरासोबतच ग्रामीण भाग आणि इतर तालुक्यांतूनही हजारो नागरीक प्रमाणपत्रासाठी या कार्यालयात येत असतात. मात्र त्यांना वेळेवर सेवा मिळत नाही. कर्मचाऱ्यांकडून उध्दट वर्तन केले जाते. नागरिकांना अनेकदा फेऱ्या माराव्या लागतात. या कार्यालयातील ही परिस्थिती अतिशय गंभीर असून प्रशासनाने तातडीने सुधारणा करणे आवष्यक असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे.




### तर कारवाई करण्याची शिफारस

महापालिकेच्या कार्यशैलीत तात्काळ सुधारणा न झाल्यास अधिकाऱ्यांवर प्रशासकीय पातवळीवर कारवाई करण्याची शिफारस करण्यास मला भाग पाडले जाईल. नागरिकांची सेवा तुमची जबाबदारी आहे आणि ती वेळेवर व तत्परतेने पार पाडली गेली पाहिजे.

**खासदार नीलेश लंके,**
लोकसभा सदस्य.

### कार्यप्रणाली सुधारा

कार्यालयात होणारी गर्दी आणि नागरिकांचा वेळ वाया जाणे हे टाळण्यासाठी अतिरिक्त खिडक्या सुरू करा, कर्मचारी संख्या वाढवा. नागरिकांना सतत महापालिकेत चकरा मारू लागू नयेत यासाठी ऑनलाईन अर्ज व प्रमाणपत्र वितरण व्यवस्था अधिक प्रभावी करा. नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तक्रार कक्ष सुरू करून ठरावीक कालावधीत तक्रारींची जबाबदारी निश्चित करा अशी सुचना खा. लंके यांनी केली आहे.

## संपादकीय

### नवे वादंग

१९५१, १९६१ आणि १९७१ मध्ये देशात जनगणना आणि मतदारसंघाची पुनर्रचना झाली. दक्षिण भारतातील लोकांनी लोकसंख्येचे नियोजन केले आणि त्या राज्यांनी प्रगतीची वाट धरली; परंतु उत्तरेकडील राज्यांत मात्र लोकसंख्या वाढत गेली आणि विकासाची गती मंदावली. दक्षिण भारतातील राज्यांच्या विकासातून मिळणारा पैसा उत्तर भारताकडे वळवला जात असून त्यामुळे त्या राज्यांत अगोदरच नाराजी आहे. त्यातच आता लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघाची पुनर्रचना केली, तर त्यातून एकतर दक्षिणेतील राज्यांत लोकसभेच्या जागा कमी होतील किंवा त्या फारशा वाढणार नाहीत आणि उत्तर भारतात मात्र लोकसभेच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढत जातील, अशी भीती दक्षिणेकडील राज्यांना आहे. त्यामुळे या राज्यांतील भाजपचे मित्रपक्ष तसेच विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांचे प्रमुख एकाच सुरात बोलत आहेत. लोकसंख्या वाढीची भाषा ते बोलत आहेत. हे चुकीचे आहे; परंतु त्यांची अशी धारणा होण्याला केंद्र सरकारची धोरणेही कारणीभूत आहेत. जगभरात लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कुटुंब नियोजन धोरणांवर भर दिला जात असताना आता कालचक्र उलटे फिरवणे योग्य नाही. दक्षिणेकडील राज्यांनी या मुद्द्यावर यापूर्वीही विरोध केला होता. लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागा वाढू नयेत, म्हणून परिसीमन १९९६ पर्यंत गोठवले गेले. त्यानंतर २००१ मध्येही २०२६ पर्यंत जागा वाढणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला होता. त्या वेळी असेही सांगण्यात आले होते, की उत्तर भारतातील राज्ये आपली लोकसंख्या बिनदिक्कतपणे वाढवत आहेत, अशा परिस्थितीत सीमांकन झाल्यास या राज्यांच्या जागा अधिक वाढतील. त्या वेळी सीमांकन २५ वर्षे गोठले होते. त्या वेळी असे मानले जात होते, की २०२६ पर्यंत उत्तर भारतातील राज्ये लोकसंख्या स्थिर करतील; परंतु आजही तसे झालेले नाही. आताही लोकसंख्या मुख्यतः उत्तर भारतातील राज्यांमध्ये वाढत आहे. केरळमधील एक खासदार १८ लाख लोकांचे प्रतिनिधित्व करतो, तर राजस्थानचे खासदार ३३ लाख लोकांचे प्रतिनिधित्व करतात. दक्षिण भारतातील लोकसंख्या वाढीचा दर आता नकारात्मक झाला आहे. उदाहरणार्थ, तामिळनाडूमधील लोकसंख्या दरवर्षी ०.०२ टक्क्यांनी कमी होत आहे. एका सरकारी मंत्र्याने सांगितले, की आता २०२१ ची जनगणना होणार आहे आणि त्याच्या आधारावर २०२६ मध्ये सीमांकन केले जाईल. परिसीमनावरून वाद निर्माण झाला आहे.

आता तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी आता परिसीमन सीमांकन करू नये, २०३१ नंतर सीमांकन करा, तोपर्यंत आम्ही लोकसंख्या थोडी वाढवू, अशी भाषा सुरू केली असून, ती पायावर धोंडा पाडून घेण्याची आहे. आता जनगणना झाली तर त्याच्या आधारे उत्तर भारतातील राज्यांतील जागा परिसीमनात वाढतील, असे त्यांना वाटते. आत्तापर्यंत, सीमांकनानंतर लोकसभेच्या जागांची संख्या सुमारे २०० ने वाढेल. सध्या ५४३ जागा आहेत त्या वाढून ७५० होतील. यामध्ये उत्तर भारतातील राज्यांमधील जागा ४०० असतील. सध्या दक्षिण भारतात लोकसभेच्या १२९ जागा आहेत. सीमांकनानंतर येथे जास्तीत जास्त १०-११ जागा वाढतील. साहजिकच उत्तर भारतातील राज्यांना अधिक फायदा होईल. या कारणामुळे दक्षिणेतील बहुतांश राज्यांचे नेते आपापल्या राज्यांमध्ये लोकसंख्या वाढवण्यावर भर देत आहेत. सीमांकन ही भारतीय संघाला आवश्यक असलेली गोष्ट आहे. तमिळनाडूतील सर्वपक्षीय बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावात ३० वर्षांसाठी सीमांकन पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली. हा ठराव केवळ एका राज्याच्या किंवा एका प्रदेशाच्या हिताचे रक्षण करणारा नाही. प्रजासत्ताक स्थापनेच्या ७५ वर्षांनंतर आता संघाच्या कराराचा विचार का करायचा? हे गंभीर प्रश्न आहेत, ज्यांची प्रामाणिक उत्तरे हवी आहेत. प्रत्येक राज्यांतर्गत संसदीय आणि विधानसभा मतदारसंघांच्या सीमारेषा पुन्हा काढण्याच्या नियमित प्रक्रियेवर किंवा राज्यांतर्गत विधानसभेच्या जागांची संख्या वाढण्यास कोणाचाही आक्षेप नाही. खरा मुद्दा विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागांच्या पुनर्वितरणाशी संबंधित आहे, जो ५० वर्षांपूर्वी पुढे ढकलण्यात आला होता. आता ही स्थगिती वाढवायची? की कायमस्वरूपी स्थगिती द्यावी? अशीच चर्चा सुरू आहे. हे मान्य केले पाहिजे, की मूळ घटनात्मक तरतूद एका तत्त्वावर आधारित होती आणि ती होती "एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य." या लोकशाही तत्त्वानुसार विधानमंडळाचा प्रत्येक सदस्य अंदाजे समान संख्येने व्यक्तींचे प्रतिनिधित्व करतो. गंभीर मतभेद असल्यास, मोठ्या मतदारसंघातील मतांचे मूल्य लहान मतदारसंघांपेक्षा कमी असते. उदाहरणार्थ, लोकसभेत ३२ लाखांहून अधिक लोकांचे प्रतिनिधित्व करणारे उत्तर भारतात अनेक खासदार आहेत, तर केरळमध्ये हा आकडा १८ लाखांपेक्षा कमी आहे. त्यामुळे केरळमधील मतदाराचे मूल्य उत्तर प्रदेशातील मतदारापेक्षा जवळपास दुप्पट आहे. ही एक विसंगती आहे. ती दुरुस्त केली पाहिजे. राज्यघटनेने लहान राज्यांना संरक्षण दिले आहे. त्यांना लोकसभेत त्यांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त प्रतिनिधित्व दिले गेले. जन्मदर आणि मृत्यू दर हे लोकसंख्याशास्त्रीय बदलाच्या मोठ्या नमुन्यांचे अनुसरण करतात. तेथे उत्तम राज्ये आणि सामाजिक गटांची लोकसंख्या जलद घटते. याचे श्रेय सरकारांनी घेणे योग्य होणार नाही. शिवाय, हा युक्तिवाद कोणत्याही गरीब आणि वंचित गटाच्या विरोधात युक्तिवाद करण्यासाठी वाढविला जाऊ शकतो. गेल्या तीन दशकांतील आर्थिक वाढीच्या पॅटर्नमुळे दक्षिण-पश्चिम भारत आणि उत्तर आणि पूर्व भारत यांच्यात स्पष्ट विषमता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे भाषिक विभाजनाचा फायदा झालेल्या प्रदेशांचा या आर्थिक विभाजनात वरचष्मा आहे. शेवटी, भाजपच्या उदयाबरोबर, उत्तर भारतीय राज्यांमध्ये, जिथे भाजपचे वर्चस्व आहे, आणि उर्वरित राज्ये, जिथे त्याचा प्रभाल कमी आहे, (कर्नाटक, ओडिशा, पश्चिम बंगाल, तेलंगणा) किंवा जिथे ते अल्पमतात आहेत (आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ) यांच्यामध्ये आणखी एक राजकीय फॉल्ट लाइन उघडली आहे. २०२६ मध्ये प्रत्येक राज्याच्या अंदाजित लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेच्या जागांचे पुनर्वितरण झाल्यास संभाव्य परिणाम काय असतील हे दर्शविते. या परिस्थितीत, सर्व दक्षिण भारतीय राज्ये पराभूत होतील. केरळ (आठ जागा कमी), तामिळनाडू (आठ जागा कमी), आंध्र प्रदेश आणि तेलंगणा (एकत्रित आठ जागा कमी), कर्नाटक (दोन जागा कमी). इतर प्रमुख पराभूत राज्ये देखील गैर-हिंदी भाषिक असतील. पश्चिम बंगाल (चार जागा कमी), ओडिशा (तीन जागा कमी), आणि पंजाब (एक जागा कमी). हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड (प्रत्येकी एक जागा खाली) वगळता, सर्व मोठा फायदा उत्तर भारतीय हिंदी भाषिक राज्यांना होईल. उत्तर प्रदेश (११ जागा), बिहार (१० जागा), राजस्थान (सहा जागा वर) आणि मध्य प्रदेश (चार जागा) या राज्यात जागा वाढतील. यामुळे हिंदी आणि बिगरहिंदी भाषिक राज्ये, विशेषत: दक्षिण भारतीय राज्यांमधील संतुलन बिघडवण्याची क्षमता आहे. सध्या ५४३ पैकी २२६ जागांवर नियंत्रण असलेल्या 'हिंदी हार्टलँड' ला आता २५९ जागा मिळतील. दक्षिणेकडील राज्ये पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील राज्यांशी हातमिळवणी करून कोणत्याही मोठ्या घटनादुरुस्तीला व्हेटो करू शकतात. ते नवीन सीमांकन व्यवस्थेत ही महत्त्वाची शक्ती गमावतील. सध्या त्यांच्याकडे १३२ जागा आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत त्याबाबत स्पष्टीकरण दिले असले, तरी दक्षिणेकडील राज्यांचा त्यावर विश्वास नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने तर मतदारसंघ पुनर्रचना हा सरकारचा विषय असून आम्ही त्यासाठी सरकारवर कोणतेही दडपण आणीत नाही किंवा हस्तक्षेप करीत नाही, असे स्पष्ट केले आहे. सध्या दक्षिण आणि उत्तर भारतात या विषयावरून सुरू असलेला विवाद भारतीय संघराज्याच्या अंतर्गत असलेल्या गैर-वर्चस्वाच्या भावनेच्या आणि विविधतेतील एकता या कल्पनेच्या विरोधात आहे.

# राज्याच्या अर्थसंकल्पातून पुढे आलेले चित्र



उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ताज्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, भावनिक मुद्दे आणि विकासाची सांगड घालण्याचा प्रयत्न केला असला, तरी एरव्ही आर्थिक शिस्तीचे भोक्ते असलेल्या अजितदादांना लोकानुनयाचा अर्थसंकल्प का जाहीर करावा लागला, हे कोडेच आहे. असे असले, तरी निवडणुकीत दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता टाळून त्यांनी अर्थसंकल्पावर अधिक बोजा पडू दिलेला नाही.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात कोणत्याही मोठ्या आणि नवीन घोषणांचा समावेश नाही. अर्थात आर्थिक पाहणी अहवालातून पुढे आलेल्या माहितीचा विचार करता पवार यांच्यापुढे किती मोठे आव्हान होते, हे स्पष्ट आहे. मर्यादित साधने, वारेमाप घोषणा आणि लोकांच्या अपेक्षा यांची सांगड घालणे कठीण होते. राज्यावर सुमारे आठ लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना तसेच महसुली आणि वित्तीय तुटीचा विचार करून जादा खर्चाच्या योजनांचा मोह अजितदादांनी टाळला आहे. जीएसटी कायदा लागू झाल्यानंतर राज्याच्या उत्पन्नवाढीलाही फारसा वाव नाही. त्यामुळे करांपासून मिळणारे उत्पन्न मर्यादित असताना शेतकरी कर्जमाफी, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याच्या लोकानुनयाच्या घोषणा त्यांनी टाळल्या आहेत. राज्याच्या दरडोई उत्पन्नामध्ये असमानता, भांडवली खर्चात कपात अशा अनेक आव्हानांना तोंड देताना पायाभूत क्षेत्राच्या जादा घोषणा करणे शक्य नव्हते. अजितदादांवर ग्रामीण संस्कृतीचा पगडा आहे. त्यांनी जुन्या लोकांची आंथरूण पाहून पाय पसरण्याचा सल्ला अंमलात आणल्याचे दिसते. राज्यांच्या अर्थसंकल्पापुढील आव्हाने लक्षात घेता अजितदादा इतिहासात रमले. भविष्यकाळाची स्वप्ने त्यांनी दाखवली; परंतु वर्तमानाचा त्यांना विसर पडला, असे मात्र त्यांच्या अर्थसंकल्पाचे वर्णन करताना नमूद करावे लागेल.

अर्थसंकल्पीय भाषण करताना अजितदादांची अर्थसंकल्पावरची पकड लक्षात आली असली, तरी त्यातील बऱ्याच कामांच्या घोषणा पूर्वीच झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अगदी गेल्या आठवड्यात केलेल्या घोषणांपर्यंतचा समावेश अर्थसंकल्पीय भाषणात असल्याने अर्थसंकल्प हा पूर्वीच्या घोषणांची तुकडेजोड आहे का, असा प्रश्न पडावा अशी स्थिती दिसली. विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याच्या तसेच शेतकऱ्यांच्या नियोजीत कर्जमाफीचा त्यात कुठेही उल्लेख नाही. अर्थात लाडक्या बहिणींसाठी ३६ हजार कोटी रुपयांच्या तरतुदीची घोषणा त्यांनी केली. या उपक्रमासाठी गेल्या वर्षी जुलै ते फेब्रुवारीदरम्यान ३२ हजार कोटी रुपये लागले असताना आता पुढच्या वर्षभरासाठी केलेली तरतूद पाहता लाडक्या बहिणींच्या लाभार्थी संख्येत मोठी घट होणे अपेक्षित धरले आहे. केंद्रीय महालेखापालांनी अनुनयाच्या योजनांबाबत व्यक्त केलेली नाराजी आणि केंद्र सरकारने केलेली कानउघाडणी यामुळे कदाचित आणखी लोकानुनयी जादा खर्चाच्या घोषणा अजितदादांनी टाळल्या असाव्यात.

असे असले, तरी अजितदादांनी अनेक योजनांच्या तरतुदींमध्ये वाढ केली. महिला आणि बालकल्याण, दलित, आदिवासी आदी घटकांसाठी जादा तरतूद केली असली, तरी गेल्या काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता वर्षअखेरीस अनुनयाच्या योजनांसाठी या महत्त्वाच्या घटकांच्या खर्चाला कात्री लावली जाते, हे विसरता येणार नाही. हा अर्थसंकल्प सादर करताना अजितदादांच्या मनात जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपंचायती आणि महापालिकांचा विचार आहे, असे दिसते. पुणे-शिरूर उन्नत मार्ग, नवी मुंबई विमानतळ, वाढवण बंदर, चौथी मुंबई, पुणे-मुंबईतील मेट्रो, नाशिकचा कुंभमेळा आदींबाबतच्या त्यांच्या घोषणा एकतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्तेबांधणी मंत्री नितीन गडकरी किंवा फडणवीस यांनी यापूर्वीच केल्या आहेत. केंद्र सरकारच्या निधीतून उभ्या राहणाऱ्या योजनांचा राज्याच्या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला आहे. शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. त्याबाबतची घोषणा अजितदादांनी केली असली, तरी तरतूद मात्र अत्यल्प आहे.

अर्थसंकल्पीय भाषणात अजितदादांनी महाराष्ट्राचा विकास, पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, परकीय गुंतवणूक, आद्यौगिक क्षेत्रातील वाढ यासह विविध विषयांवर भाष्य केले. महाराष्ट्रात देशी आणि विदेशी गुंतवणूक आकर्षित होत आहे. महाराष्ट्रात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटींची गुंतवणूक होत आहे. त्यातून, लाखोंची रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी सांगितले असले, तरी आर्थिक पाहणी अहवालात मात्र उत्पादन क्षेत्रात झालेली घट पाहता ही गुंतवणूक उत्पादन क्षेत्रात न होता अन्य क्षेत्रात झाली का, असा प्रश्न पडतो. राज्याचे नवीन औद्योगिक

**मागोवा**

**– जनार्दन पाटील**

धोरण जाहीर करताना त्यांनी केलेली आणखी एक महत्त्वाची घोषणा म्हणजे उद्योगांना पुरवल्या जाणाऱ्या विजेच्या दरातील कपात. अर्थात या घोषणेतही काहीच नावीन्य नाही. वीज नियामक आयोगाला गेल्या महिन्यात महावितरणने पाठवलेल्या प्रस्तावात त्याचा उल्लेख आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत कमी दर असतील, अशा मोघम घोषणेतून विजेचे दर काय असतील, हे मात्र ध्वनित होत नाही. शेजारच्या कर्नाटक, गुजरात, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशापेक्षा आणि स्पर्धक असलेल्या तमिळनाडूसह अन्य राज्यांपेक्षा कमी दर असतील, तरच उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणूक करतील.

सरकारतर्फे स्वतंत्र शेती धोरणही नंतर जाहीर करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार-बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० बिलियन डॉलरवरून २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर, तर २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया येथून मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासासाठी अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात येणार आहे. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात असमान विकास आणि राज्यातील जिल्ह्यांचे असमान दरडोई उत्पन्न याचा विचार करता मुंबईला आणखी जादा प्रकल्प आणि तुलनेने छत्रपती संभाजीनगर वगळता मराठवाडा, नागपूर वगळता विदर्भ आणि नाशिक वगळता उत्तर महाराष्ट्रात मात्र विकासाला आणखी काही गती देता येईल, याचा विचार केलेला नाही.

महाराष्ट्रात आता नागरी लोकसंख्येचे प्रमाण पन्नास टक्क्यांवर गेले असल्याचा अंदाज आहे. नागरी भागात पायाभूत सुविधा दिल्याच पाहिजेत; परंतु त्याचबरोबर ग्रामीण भागाची उपेक्षा केली, तर शहरांकडे स्थलांतर वाढत जाईल आणि पायाभूत सुविधांवर आणखी ताण पडेल, हे लक्षात ठेवले पाहिजे. मुख्यमंत्री पालकमंत्री असलेला गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून उदयाला येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्यासाठी २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून सात हजार ५०० इतकी रोजगारनिर्मिती होणे अपेक्षित आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गाचे जाळे विकसित केले जात असून त्यासाठी पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. एकीकडे राज्याचा खर्च वाढतो आहे. दोन वर्षांमध्ये अडीच लाख कोटी रुपयांचे कर्ज फेडायचे आहे. वित्तीय तूट ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा पुरवणी मागण्यांमध्ये पुन्हा एक लाख कोटी रुपयांपर्यंतच्या मागण्या मांडून आर्थिक शिस्त बिघडवली जाते. महसुली तूट आणि वित्तीय तूट निकषांपेक्षा कमी असल्याचे सांगितले जात असले, तरी ती आणखी कमी ठेवणे आवश्यक आहे. राज्यावरचे कर्ज आता पावणेआठ लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल. त्यामुळे अनावश्यक खर्चावर नियंत्रण आणले पाहिजे; परंतु सध्या इतर पक्षांकडून असलेला दबाव पाहता अजितदादांना आपल्या स्वभावाला मुरड घालावी लागत असल्याचे चित्र आहे.

सार्वजनिक वाहतूक सेवा, वाहतुकीची कोंडी याचा उल्लेख अजितदादांच्या अर्थसंकल्पीय भाषणात होता. एसटीच्या सहा हजार गाड्यांचे सीएनजी आणि पीएनजीमध्ये रुपांतर करण्याची घोषणा त्यांनी केली; परंतु एसटीचे देणे आणि नवीन बसखरेदीच्या तरतुदीचा उल्लेख नाही. राज्यातील वेगवेगळी महामंडळे पांढरे हत्ती ठरत असताना आता आणखी १८ महामंडळाचा बोजा सरकारवर पडणार आहे. सरकारच्या उत्पन्नवाढीला आता मर्यादा आहेत. अजितदादांनी राज्यातील वाहनांवर कर लावून ती महाग केली आहेत तसेच दुसरा मुद्रांक वापरताना त्याची किंमत शंभर रुपयांवरून थेट एक हजार रुपये केली आहे, याचीही नोंद घ्यायला हवी. एकुणात मात्र फारशी करवाढ न लादणारा, मागील पानावरुन पुढे नेणारा असा हा मध्यममार्गी अर्थसंकल्प आहे, असे म्हणता येईल.

# जसं पेराल तसं ऊगवेल

**रमजानुलमुबारक-२२**

**सलीमखान पठाण**
मो. ९२२६४०८०८२.



रमजान महिन्याचा तिसरा आणि शेवटचा भाग काल सायंकाळपासून सुरु झाला आहे.याला जहन्नुम पासून मुक्तीचा काळ संबोधले जाते. रमजानचा हा शेवटचा भाग खूप महत्वाचा आहे.या दहा दिवसात दररोज रात्री अधिक काळ प्रार्थना करुन अल्लाहची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. या महिन्याच्या शेवटच्या भागात लैलतुल कद्र ही एक अशी रात्र आहे कि या रात्री केलेल्या प्रार्थनेचे पुण्य हे हजार महिन्यांच्या पुण्या समान आहे.पण ती रात्र नेमकी कोणती हे अल्लाहने गुप्त ठेवले आहे. शेवटच्या खंडातील २१ते २९ तारखा दरम्यान विषम संख्येतील ती एक रात्र आहे.पण ती रात्र नेमकी कोणती हा प्रश्न आहे म्हणून दहाच्या दहा रात्री जर आपण थोडी अधिक प्रार्थना केली तर बिघड़लं कुठं?या रात्रीत एक रुपया दान केला तर हजार महिने रुपये दान केल्या समान आहे.दोन रकात नफील नमाज आदा केली तर हजार महिन्याची दोन रकात आदा केल्यासारखे आहे.म्हणजे एकदा एक कार्य केले तर हजार महिने केल्यासारखे पुण्य प्राप्त होत असल्याने दहा रात्री प्रार्थना करणारा निश्चितच अधिक पुण्य प्राप्तीस पात्र ठरतो.अल्लाहने आपल्याला दिलेले जीवन सत्कारणी लावण्यासाठी आपण सद्वर्तन,सद् विचार, सदाचाराने जगणे आवश्यक आहे. आपण जे इतरांना दयाल ते तशीच फेड करतील म्हणून जीवनात प्रत्येक कार्य करतांना मनात हा विचार असावा.व्यापार, व्यवहार,वर्तन या सर्व बाबतीत काळजी घेणे आवश्यक आहे. व्यवहारात खोटेपणा, फसवणूक असे प्रकार करू नये,कारण ज्याला फसवले जाते त्याची हाय किंवा तळतळाट ज्याला बद्दुआ म्हणतात ती चांगली व्यवहारात सचोटी नसल्यास माणसे जीवनातून उठतात.

दिलेले शब्द पाळणे व आपल्यावर केलेल्या उपकारांची जाणिव ठेवणे आवश्यक आहे. कृतज्ञता बाळगल्याने आत्मशांती प्राप्त होते तर कृतघ्नपणा केल्याने मनोशती भंग पावते.जे पेराल ते उगवेल या न्यायाने आपण केलेल्या कामाचा तसाच मोबदला आपणास मिळत असतो.यासाठी ईश्वराशी नाते जोडुन सत्य आणि सचोटीची कास धरल्यास जीवन यशस्वी होते.एका राजाने आदल्या दिवशी घोषणा केली कि उद्या सकाळी दरबारात येऊन कोणतीही व्यक्ति नसते. ज्या वस्तूला हात लावील ती त्याची होईल. हे ऐकून प्रत्येक जण विचार करु लागला कि मी सोने, चांदी,नाणे,महाल घेईल एक खूपच दरिद्री माणूस दरबारात आला व त्याने राजालाच हात लावला. आता राजाच त्याचा झाल्याने राजाची प्रत्येक वस्तू त्याची झाली. याप्रमाणे या सृष्टीचा जो राजा आहे तो ईश्वर/ अल्लाह,त्याला आपले केले तर सर्व जग आपले होणार आहे. तेव्हा त्याला आपले करण्याचा जो काही मार्ग आहे तो आपण अंगीकारल्यास सर्व काही आपले होईल हे ध्यानात घ्यावे.

( क्रमशः)



## बंडू पाठक आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : आधुनिक तंत्रज्ञानाची सोबत घेऊन नाविन्य पूर्णरीत्या शेती समृद्ध करणाऱ्या शेतकरी बांधवांचा गुणगौरव सोहळा पाथर्डी तालुक्यातील आदिनाथ नगर येथील दादा पाटील राजळे शिक्षण संस्थेच्या डॉक्टर अण्णासाहेब शिंदे कृषी तंत्र विद्यालयाच्या प्रांगणात शनिवारी पार पडला. यावेळी सातवड येथील प्रगतशील शेतकरी बंडू पाठक यांचा आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन आमदार मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी वृद्धेश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रामकिसन काकडे, संचालक राहुल राजळे, तालुका कृषी अधिकारी एम बी लोंढे,मंडळ कृषी अधिकारी नंदकिशोर थोरे, प्राचार्य एस पी पानखडे यांच्यासह अनेक शेतकरी यावेळी उपस्थित होते यावेळी इतर क्षेत्रात नाविन्यपूर्ण यश मिळवलेल्या व्यक्तींचा आमदार राजळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## विद्यार्थ्यांचा कला गुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन महत्त्वाची : कराड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पानेगाव** : विद्यार्थ्यांचा कला गुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन महत्त्वाची असतात असे प्रतिपादन नेवासे पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पानेगांव २०२५ वार्षिक स्नेहसंमेलनात केले.

कराड यांनी म्हटले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी आता मागे नाही. वेगवेगळ्या कला त्यांचा अंगात असतात ह्या कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ शिक्षण विभागाच्या वतीने राज्यभरात आयोजन करण्यात येते. शासन स्तरावरून निधी नसताना शिक्षक वृंद, ग्रामपंचायत स्तरावरील पदाधिकारी गावातील सामाजिक कार्यकर्ते यांचा अर्थिक मदतीने हे आयोजन होत असते. येथिल शाळा तालुक्यात आदर्शवत असून येथील शिक्षक वृंद तसेच शाळेसाठी योगदान देणाऱ्यांचे विशेष कौतुक कराड यांनी करुन जिल्हा स्तरावर आदर्श शाळा म्हणून पुरस्कार मिळावा यासाठी मी स्वतः पाठपुरावा करेल कराड यांनी सांगितले.

यावेळी मा.लोकनियुक्त सरपंच मुळाचे संचालक संजय जंगले यांनी आपल्या मनोगतात




सांगितले की, शाळेसाठी नेहमीच अग्रभागी असतो तालुक्यात डिजिटल शाळा त्याचबरोबर येथे सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे शाळा बघण्यासाठी जिल्हा, तालुका स्तरावरील अधिकारी तसेच नेहमी लोकं येतं असतात.

जवळपास तीन तास चाललेल्या कार्यक्रमात चिमुकल्यांचा तालावर आनंदाचा जल्लोष मध्ये नव्या जून्या देश गीतं भक्ती गीते गाण्यांबरोबरचं छत्रपती संभाजी महाराजांचा जिवनावरील छावा चित्रपटातील गीतांच मोठं आकर्षण या निमित्ताने ठरलं यावेळी भरभरून प्रतिसादा बरोबरच बक्षीस मोठ्या प्रमाणावर मिळाले.

यावेळी हनुमंत फुंदे, विजय जंगले, सरपंच सौ. निकीता भोसले/ आंबेकर, उपसरपंच दत्तात्रय घोलप, मुख्याध्यापक विष्णू दहिफळे, मच्छिंद्र खेमनर, अरुण ढेरे, छाया देठे, संकेत गुडधे, मंगल गुडधे, सविता जंगले, गोदा चिंधे, बाबासाहेब जंगले, सतिश जंगले, ज्ञानेश्वर जंगले, हौशाबापू जंगले, किशोर जंगले, अमित जंगले, सुरज जंगले, बाळासाहेब नवगिरे, नामदेव गुडधे, अनिल चिंधे, उत्तम तांबे, ज्ञानदेव गुडधे, उद्धव चिंधे, सुरेंद्र जंगले, रंगनाथ जंगले, बाबासाहेब शेंडगे, गणेश गायकवाड सुनिल चिंधे, शुभम जंगले, मोहनराव दहिफळे,लक्ष्मीकांत जंगले, आरुण सोनवणे, गणेश जंगले,रामदास गागरे ,लक्ष्मण गागरे, रविंद्र सोनवणे, प्रविण सोनवणे, किरण जंगले आदींसह ग्रामस्थ महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुत्रसंचलन संदिप जंगले यांनी केले. आभार संकेत गुडधे यांनी मानले.



## डोंगर पायथ्याच्या माळरानावर फुलवली टरबुजाची बाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील कष्टाळू महिला प्रगतशील शेतकरी सुनिता छबुराव क्षेत्रे या महिलेने डोंगर माळरानावर टरबूजाची लागवड करून ऐन उन्हाळ्यात टरबूज विक्रीला आल्याने या महिलेच्या कष्टाचे चीज झाले असून या टरबूज विक्रीतून या महिलेला मोठा आर्थिक दृष्ट्या हातभार लागला आहे. या टरबुज शेतीसाठी सुनिता क्षेत्रे यांना त्यांची मुलं विश्वास क्षेत्रे, प्रकाश क्षेत्रे, बाबासाहेब क्षेत्रे यांचे देखील मोठे पाठबळ मिळाले असून पूर्वी नापीक असलेली ही जमीन सुनीता क्षेत्रे व त्यांच्या तीन मुलांनी मोठे काबाडकष्ट करून ही जमीन सुपीक केली व या नापीक जमिनीतून टरबूज बागेच्या माध्यमातून मातीतून सोन उगवल्यागत यश मिळवले आहे. काळ्या आईने दिलेली साथ या कष्टाळू महिलेच्या जिद्दीला आणि प्रयत्नाला बळकटी देणारी ठरली आहे. या टरबूज विक्रीच्या माध्यमातून क्षेत्रे यांना मोठा आर्थिक लाभ देखील होत आहे.

# ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूंचा संगमनेरात सामना

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुलात रंगणार क्रिकेटचा थरार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : क्रिकेट हा भारतामध्ये अत्यंत लोकप्रिय खेळ असून महिला क्रिकेटची लोकप्रियता ही वाढली आहे. ऑस्ट्रेलियाच्या आंतरराष्ट्रीय प्रथम श्रेणी महिला क्रिकेट संघातील खेळाडू रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी संगमनेर मध्ये येणार असून त्या स्थानिक महिला खेळाडूंबरोबर प्रदर्शनीय सामना खेळणार आहेत याचबरोबर स्थानिक महिलांना प्रशिक्षणही देणार आहेत.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुलात क्रिकेट असोसिएशन ऑफ संगमनेर व जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहकार महर्षी चषक




२०२५ निमित्ताने ऑस्ट्रेलियाचा महिला प्रथम श्रेणी क्रिकेट संघ संगमनेर मध्ये येणार आहे. सहकार महर्षी चषक मागील २५ वर्षापासून या क्रीडा संकुलात होत असून यामध्ये आयपीएल सह आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. तर मागील तीन वर्षापासून एकविरा फाउंडेशन च्या वतीने महिलांच्या क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहाने संपन्न झाल्या आहेत.

रविवारी या ऑस्ट्रेलियाच्या प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सर्व महिला खेळाडू क्रिकेट किट मध्ये स्थानिक महिला खेळाडूंबरोबर प्रदर्शनीय सामना खेळणार आहेत. यामध्ये दोन्ही संघांमध्ये प्रत्येकी ऑस्ट्रेलियाच्या पाच व स्थानिक सहा खेळाडूंचा समावेश राहणार आहे. हा सामना केवळ खेळापुरता मर्यादित न राहता स्थानिक खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संघांसोबत खेळण्याचा अनुभव मिळावा, यासाठी आयोजित केला आहे.

यावेळी प्रदर्शनीय सामन्यानंतर सायंकाळी ५ वा. लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सर्व ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटूंचा सन्मान सत्कार संगमनेरकरांच्या वतीने करण्यात येणार आहे. हा सामना पाहण्याकरता संगमनेर मधील सर्व महिला व युवक क्रीडाप्रेमींनी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे उपस्थित रहावे, असे आवाहन क्रिकेट असोसिएशन ऑफ संगमनेर जय हिंद लोक चळवळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाचाल तर आयुष्यभर सरळ चालाल

## प्रा. डॉ. सोनवणे; फिरते मोफत वाचनालय उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**


**हंडीनिमगाव** : आजच्या मोबाईलच्या युगात वाचन जरी कमी होत असले तरी पुस्तक वाचन जीवनात महत्त्वाचे असून वाचाल तर वाचाल या नियमानुसार जो सातत्याने वाचन करतो तो आयुष्यभर सरळ मार्गाने जीवन जगतो किंवा चालतो असे उद्गार शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य नेवासा शाखेचे सल्लागार व श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा येथील इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर दिगंबर सोनवणे यांनी काढले .

शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य नेवासा शाखेचा फिरते मोफत वाचनालय उपक्रम आज नेवासा तालुक्यातील खरवंडी गावात घेण्यात आला. याप्रसंगी ग्रामस्थांना पुस्तक वाचनाचे महत्त्व सांगताना प्राध्यापक डॉक्टर दिगंबर सोनवणे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गोरक्षनाथ शिंदे होते. प्रारंभी शब्दगंध नेवासा शाखेचे उपाध्यक्ष दिगंबर गोंधळी यांनी संबळ वाद्य वाजवून गोंधळ गीत सादर करून वातावरण निर्मिती केली. शाखेची दुसरे सल्लागार माझी प्राचार्य व कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे यांनी शब्दगंधाच्या फिरते वाचनालयाचा उद्देश स्पष्ट करून वाचन संस्कृती वृद्धिंगत होणे किती गरजेचे आहे हे सांगितले.

शब्दगंध नेवासा शाखेचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर किशोर धनवटे यांनीही मनोगते व्यक्त केले.याप्रसंगी गोरक्षनाथ शिंदे अशोक फाटके, संतोष राजळे चंद्रकांत राऊत बाळासाहेब जाधव, देविदास पंडित, वसंत भोगे, रवींद्र कुरे, संजय भोगे, गणपत कुऱ्हे, यशवंत सिरयाठ, नंदराज भोगे, कचरू सुरवसे, परेश चोरडिया, नानासो फाटके, रामभाऊ जाधव, अमोल भोगे, संतोष_रोकडे, संघर्ष निकाळजे, देवराम कुऱ्हाडे, परेष चोरडीच इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

# षष्ठीच्या काल्यात पांडुरंग महाराजांचे किर्तन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र गोळवाडी येथे दिंडी श्री क्षेत्र पैठण येथे आनंदात आगमन झाले होते. त्यानिमित्ताने षष्ठीच्या दिवशी नामदेव महाराज ढवळे यांचे कीर्तन झाले.

नामदेव महाराजांनी अभंगांमध्ये सांगितले. भगवान श्रीकृष्णाचे चरित्र उच्चाराचे व प्रभू श्रीराम यांचे चरित्र आचरणात आणायचे. असे त्यांनी त्यांच्या अभंगाच्या विश्लेषण स्पष्ट केले आहे.काल्याचे किर्तन संपूर्ण झाल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला.

त्यानिमित्ताने गोळवाडी गावचे भूमिपुत्र शैलेश भैय्या सुराशे यांनी महाप्रसादाचे योगदान दिले आहे. अनिल दादा पगार, गणू काका पगार (माजी सरपंच), सुनील मांजरे (ग्रामपंचायत सदस्य) बाबासाहेब ठोंबरे (ग्रामपंचायत सदस्य) सुनील ठोंबरे, भागिनाथ मांजरे, लक्ष्मण थोरात, भीमराज पगार, दिनकर सांबरे, बाबासाहेब शिंदे, बाबासाहेब महाराज पगार इत्यादी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. गावातील भावी फक्त कीर्तनासाठी उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** :अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून पसार झालेल्या आरोपीला शेवगाव पोलिसांनी गजाआड केले आहे. संदिप माणिक सरसे (रा. खरडगाव ता. शेवगाव जि.अहिल्यानगर) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी आरोपीने पिडितेस फोनवर मेसेज करुन मला तुला भेटायचे आहे, असे सांगुन रात्री घराचे काही अंतरावर बोलावून घेतले. पिडीता या ठिकाणी आली असता आरोपीने पिडितेच्या आई वडिलांना जिवे ठार मारण्याची धमकी देत तिची इच्छा व संमती नसताना देखील त्याने बळजबरीने तिच्यावर अत्याचार केले. तसेच झालेल्या प्रकाराबाबत कोणाला काही सांगितले तर जिवे मारण्याची धमकी देवुन पळून गेला. यानंतर पिडीतेच्या फिर्यादीवरून आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपी हा गेले सहा महिण्यांपासून त्याचे वास्तव्याचे ठिकाण बदलून नाशिक, पुणे, सातारा, सांगली, गुजरात येथे राहत होता. शेवगाव पोलीस निरीक्षक समाधान नागर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, नमुद गुन्ह्यातील आरोपी ` संदिप माणिक सरसे वय सुपा (ता. पारनेर) येथे आल्याची माहिती मिळाली. प्राप्त माहितीनुसार त्यांनी तत्काळ एक पथक सुप्याच्या दिशेने रवाना केले. सुपा टोल नाका येथे सापळा लावून आरोपी सरसे याला अटक केली.



### कारवाईत यांचा होता सहभाग

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक राकेश ओला, अहिल्यानगर, अपर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील (उपविभाग शेवगांव) यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. समाधान नागरे, पोहेका. किशोर काळे, पोहेकॉ. चंद्रकांत कुसारे, पोकॉ. शाम गुंजाळ, पोकॉ. संतोष वाघ, पोकॉ. प्रशांत आंधळे, पोकॉ. संपत खेडकर तसेच नगर दक्षिण सायबर सेलचे पोकॉ. राहुल गुड्डु व पोकॉ. नितीन शिंदे यांनी केली असुन या गुन्ह्याचा तपास पो. नि. समाधान नागरे हे करीत आहेत.

# वासुंदेत जलसंधारण चळवळ उभारणार

## सुजित झावरेंच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : आंतरराष्ट्रीय जलदिन व पारनेर तालुक्यामध्ये ज्यांच्या माध्यमातून नदीजोड प्रकल्प, संपूर्ण तालुक्यात १३६ बंधारे व एकट्या वासुंदे गावामध्ये १६ साखळी बंधारे निर्मिती, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पाझर तलाव निर्मिती अशी अनेक पाणी अडविण्यासाठी विकासकामे झाली, असे पारनेर तालुक्याचे अभ्यासू नेतृत्व सुजितराव झावरे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वासुंदे येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




पुरातन श्री महादेव मंदिरात जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते आज रविवारी सकाळी ८. ३० वाजता अभिषेक संपन्न होणार आहे. सकाळी ९ वाजता महाराष्ट्र शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळमुक्त शिवार योजनेतंर्गत सुजित झावरे पाटील यांचे विशेष प्रयत्नाने पुणे येथील संकल्प फाऊंडेशनच्या माध्यमातून व देवकृपा फाऊंडेशन यांच्या सहकार्याने वासुंदे येथील सर्व पाझर तलाव, सिमेंट बंधारे, ओढा नाला खोलीकरणाचे काम या राज्यव्यापी व्यापक चळवळीचा शुभारंभ संपन्न होत आहे. सकाळी ९.३० वाजता वासुंदे गावातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप , तदनंतर सकाळी ११.३० वाजल्यापासून सुजित झावरे पाटील हे नगर येथील देवकृपा संपर्क कार्यालयात उपस्थित राहणार आहेत.

# रांधे येथे श्री स्वामी कथेचे आयोजन

## हभप नारायण महाराज काळे सांगणार आहेत कथा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : श्री स्वामी समर्थ प्रकटदिन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने रांधे येथील माळवाडी मध्ये श्रीक्षेत्र पैठण येथील प्रसिद्ध ज्ञानमार्तंड नारायण महाराज काळे यांच्या सुश्राव्य



वाणीतून गुरुवार दि. २७ ते ३१ रोजी अखंड श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेचे प्रवचन आयोजीत करण्यात आले असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अनिलराव आवारी यांनी दिली. रोज संध्याकाळी ७. ३० ते ९. ३० या काळात कथा होणार आहेत.

या कथेत बाभुळवाडेचे श्री केदारेश्वर प्रासादिक भजनी मंडळ, रांधेचे श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, दरोडीचे हनुमान प्रासादिक भजनी मंडळ यांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तर रविवार दि. ३० रोजी वडझिरे येथील विठ्ठल रुक्मिणी पायी दिंडी सोहळा आयोजीत करण्यात आला असून गजानन, हनुमान, श्रीराम, भैरवनाथ, संगमेश्वर, सिध्देश्वर, विठ्ठल, चोंभेश्वर, खोडदेबाबा, रेणुकामाता प्रासादिक भजनी मंडळांचा भजन सेवेचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. अखेरच्या टप्प्यात सोमवार दि. ३१ रोजी सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० वाजता यज्ञ व प्राणप्रतिष्ठा विधी व सायंकाळी ५ ते रात्री ८. १५ वाजता रांधे येथील ग्रामदैवत रांधु आई, प्रति पंढरपूर असलेले विठ्ठल रुक्मिणी, चारंग बाबा, भैरवनाथ, हनुमान महाराज, श्री गुरुदेव दत्त, श्री खंडोबा या देवांच्या व श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भेटी व भव्य पालखी मिरवणूक आणि वितरण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. रात्री ९ . ३० ते ११ वाजेपर्यंत थोर उदार व दानशूर अन्नदाते यांच्या लोकसहभागातून अन्नदान महाप्रसाद करण्यात येणार असून रात्रीच्या वेळी फटाक्यांची आतिषबाजी आयोजीत करण्यात येणार आहे.

### समर्थांची महती कळणार

पारनेर तालुक्याच्या इतिहासात प्रथमच श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेचे प्रवचन आयोजीत करण्यात आले आहे. यातून श्री स्वामी समर्थ महाराजांचे जीवन चरित्र प्रवचनाच्या माध्यमातून उलगडून सांगण्यात येणार असून त्यातून श्री स्वामी समर्थ महाराजांची महती कळणार आहे.

# स्वराज्य रक्षक गडासाठी लढा उभारणार

## सौरभ खेडेकर; जिजाऊ रथयात्रेचे जल्लोषात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : छत्रपती संभाजी महाराजांच्या ९ वर्षाच दैदिप्यमान संघर्षमय कारकीर्दीमध्ये मुघलांना 'सळो की पळो' करून सोडले होते. मुघल जरी मुस्लीम असले तरी स्वराज्याचा संघर्ष सत्ता संघर्ष होता तो धार्मिक कधीही नव्हता. मात्र काहींच्या विचाराने काम करणाऱ्या प्रवृत्तींनी किल्ले बहादूरगडचे नाव धर्मवीरगड ठेवून छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याला धार्मिकतेचे स्वरूप दिले आहे. हि बनवेगिरी संभाजी ब्रिगेड उघडी पडणार असून बहादूरगड किल्ल्याचे नामकरण स्वराज्य रक्षक गड असे करण्यासाठी लवकरच मोठे आंदोलन उभा करण्यात येणार असल्याचे वक्तव्य



संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रीय महासचिव आणि जिजाऊ रथयात्रेचे अध्यक्ष सौरभ खेडेकर यांनी केले.

बहादूरगड येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य स्मारकास अभिवादन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक प्रा. अर्जुनराव तनपुरे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राऊत, महिला जिल्हाध्यक्ष राजेश्री शिंदे, जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा स्वाती जाधव, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजि. शाम जरे, पारनेर तालुकाध्यक्ष सचिन काकडे, उपाध्यक्ष दिलीप लबडे, पेडगावचे सरपंच इरफान पिरजादे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रसंत शेख महंमद महाराज यांच्या प्रांगणामध्ये जिजाऊ रथ यात्रेचे आगमन झाल्यानंतर शेख महंमद महाराजांचे वंशजांनी रथयात्रेचे स्वागत केले.

### अनेक तरूण ब्रिगेडमध्ये प्रवेश करणार

जिजाऊ रथ यात्रेसाठी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी घेतलेले परिश्रम व केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल सर्व स्तरातुन कौतुक होत आहे. संभाजी ब्रिगेडचे विचार व कार्याने प्रेरित होऊन अनेक तरुण वैचारिक मान्यवर संभाजी ब्रिगेडमधे प्रवेश करत असल्याची माहिती श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजि. शाम जरे यांनी यावेळी दिली.

# संभाजी ब्रिगेड पक्षाशी संबंध नाही: अरविंद कापसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेची स्थापना १९९५ तर संभाजी ब्रिगेड पक्षाची स्थापना २०१६ साली झाली असल्याने संभाजी ब्रिगेड पक्ष व सामाजिक संघटना यांचा एकमेकांशी कसलाही संबंध नाही.

दिनांक १९ मार्च २०२५ रोजी श्रीगोंदा शहरात जिजाऊ रथ यात्रा दाखल झाली. रथ यात्रा नियोजनामध्ये आमचा कुठलाही सहभाग नव्हता आणि आमच्या कुठल्याही पदाधिकाऱ्याला या बाबत विचारात घेतले गेले नाही.राजमाता जिजाऊ आमच्या प्रेरणास्थान असल्याने तसेच तमाम बहुजन समाजाच्या मनामध्ये जिजाऊ माँसाहेबांविषयी नितांत आदर आहे. याच भावनेतून आम्ही संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेचे पदाधिकारी तसेच इतरही जिजाऊ प्रेमी बंधू भगिनी रथाचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होतो. जिजाऊ रथ यात्रेचे स्वागत हे जिजाऊंच्या लेकींकडून होणे अपेक्षित असतांना या कार्यक्रमादरम्यान जिजाऊंच्या लेकींनाच जिजाऊंचे दर्शन घेण्यास आडवल्याचा प्रकार झाल्याचे समजले. ज्या महिलांना अडवले गेले त्या सर्व वेगवेगळ्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी आहेत. म्हणून ही बाब गंभीर असून महिलांच्या स्वातंत्र्याला गदा आणणारी आहे. या घटनेचा संभाजी ब्रिगेड संघटनेच्या वतीने आम्ही निषेध करतो, तसेच समतेचा नारा देणाऱ्यांकडून महिलांना अशी वागणूक देण्याचा प्रकार पुरोगामी महाराष्ट्रात पुन्हा घडू नये यासाठी सर्वांनी खबरदारी घ्यावी अशी विनंती संभाजी ब्रिगेड संघटनेचे जिल्हाध्क्ष अरविंद कापसे यांनी यावेळी भावना व्यक्त केली.

# वृक्ष लागवडीबरोबर संगोपणही महत्वाचे: शिवाजी पालवे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : समृद्ध व आनंदी जीवनासाठी पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे. वाढत्या औद्योगीकरणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ होऊन पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्यासाठी वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. असे मत जय हिंद फाउंडेशनचे अध्यक्ष वृक्षमित्र शिवाजी पालवे यांनी व्यक्त केले.

सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून २१ मार्च जागतिक वन दिनाचे औचित्यसाधून वन क्षेत्रपाल सामाजिक वनीकरण क्षेत्र पाथर्डी यांचे मार्गदर्शनाखाली यशवंत विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. वन क्षेत्रपाल



सामाजिक वनीकरण क्षेत्र पाथर्डी यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून पालवे बोलत होते. यावेळी वनपाल विजय जावळे, वनरक्षक पिसे, सपकाळ, यशवंत महाविद्यालयाचे मुख्याध्यापक परशुराम साबळे तसेच प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संजय दरेकरसह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे अंतर्गत जागतिक वन कार्यक्रम साजरा केला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व यशवंत महाविद्यालय शिराळ येथे वृक्षदिंडी काढून वृक्षरोपणाने जागतिक वन दिन साजरा करण्यात आला. वनपाल विजय जावळे यांनी वन वाचवण्यासाठी उपाय योजना बद्दल माहिती देऊन 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश विद्यार्थ्यांना दिला.पर्यावरण रक्षण केल्यास आपले रक्षण व सुखमय जीवन होईल यात शंका नाही असे प्रतिपादन मुख्याध्यापक संजय दरेकर यांनी केले.

### २० हजार झाडांची केली लागवड

जय हिंद फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे २० हजार झाडांची लागवड विविध ठिकाणी करण्यात आली असून ही मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे. जय हिंद सेवा फाउंडेशनच्या माध्यमातून मोहिमेसाठी झाडाचा पुरवठा केला जात असुन पर्यावरण व रक्षण व ऑक्सिजन निर्मितीसाठी उपयुक्त असणारे वड, पिंपळ, चिंच, आंबा, उंबर, बेल, बोरी अशा प्रकारची झाडांची लागवड व संवर्धनकरण्यावर अधिक भर असल्याचे शिवाजीराव पालवे यांनी सांगितले.

# पैठणच्या नाथनगरात भरला वारकऱ्यांचा मेळा!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी** :'दिंड्या पताका वैष्णव नाचती, पैठणचा महिमा वर्णावा किती, संत एकनाथच माझी माय, आम्हा सुखा उने काय', असे अभंग गात लाखो वारकरी भक्तीरसात चिंब झाले. पैठण येथील शांतिब्रह्म श्री. संत एकनाथ महाराज यांच्या नाथषष्ठी सोहळ्यासाठी शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी, शेकटे बुद्रुक येथील श्री. क्षेत्र संस्थान नारायणदास गडाचे मठाधिपती महंत बालकदास महाराज यांच्या नेतृत्वाखाली भव्य अशा पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यासाठी राज्यातील विविध संत-महंत, महाराज मंडळी, वारकरी यांनी पैठण येथील प्रतिष्ठान नगरीत हजेरी लावून या सोहळ्यात सहभागी झालेले वारकरी तृप्त झाले होते. वारकऱ्यांच्या गर्दीने अवघी संतनगरी भक्तीसागरात न्हावून निघाली, आणि गेल्या चार दिवसापासून नाथांच्या प्रतिष्ठान नगरीत हरिनामाचा गजर करीत मग्न असलेले लाखो वारकऱ्यांनी शनिवारी नाथषष्ठीचा काला, प्रसाद घेऊन नाथासमोर नतमस्तक होऊन या वैष्णवाच्या मेळाव्यातून निरोप घेतला असून याच नाथांच्या प्रतिष्ठान हरीनगरीत गेल्या चार दिवसांपासून शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी, शेकटे बुद्रुक येथील नारायणदास गडाचे मठाधिपती महंत बालकदास महाराज यांच्या नेतृत्वाखाली हरिनामाचा गजर करून तब्बल सहा दिवसांच्या कालावधीनंतर भव्य अशा या पायी दिंडी सोहळ्याची सांगता शनिवार दि. २२ रोजी सकाळी महंत बालकदास महाराज यांच्या सुश्राव्य अशा काल्याचे किर्तनाने, महाप्रसादाने तसेच काल्याची दहीहंडी फोडून सांगता करण्यात आली. यावेळी नारायणदास गडाचे मठाधिपती महंत बालकदास महाराज, ह.भ.प. भाऊसाहेब महाराज गरड, श्रीकिसन काकडे, भगवान गरड, अमोल आहेर, कैलास शेंडगे, मारुती शिंदे, विठ्ठल बागडे, हनुमान गरड, अक्षय फाटे, अशोक गरड, अविनाश पाथरकर, बबलू काशीवाले, शोभराज बागडे, सुधाकर खेडकर, पत्रकार इसाक शेख यांच्यासह आदीसह या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी वारकरी, भजनी मंडळ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### नाथषष्ठीत ६०० दिंड्यांची उपस्थिती!

नाथषष्ठी यात्रेनिमित राज्यभरातील जवळपास सहाशे वारकरी दिंड्या पैठणमध्ये दाखल झाल्या आहेत. यात जालना, परभणी, धाराशिव, नांदेड, जळगाव, अहिल्यानगर यासह विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यातील दिंड्यांचा समावेश आहे. षष्ठीदरम्यान, दिंडीसह आलेल्या जवळपास सहा लाखांहुन अधिक वारकऱ्यांनी नाथ समाधीचे दर्शन घेतले. कालाष्टमीला शनिवारी परंपरेनुसार काला दहिहंडी फोडून नाथषष्ठी यात्रोत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# स्व. कोल्हे हे ज्ञान आणि विचारांचे विद्यापीठ

## सुमित कोल्हे; स्व. कोल्हे यांच्या पुण्यस्मतिथी ते जयंतीनिमित्ताने व्याख्यान माला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : स्व. शंकरराव कोल्हे यांनी पुणे विद्यापीठातुन १९५० साली बी. एस. सी. ॲग्री ही पदवी संपादन केली आणि उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. तेथे नोकरीच्या मोहात न पडता मायदेशी येवुन समाजासाठी कार्य करीत राहीले. त्यांच्या एकुण जीवन प्रवासावरून व त्यांनी केलेल्या कार्यातुन स्व. शंकरराव कोल्हे हे ज्ञान आणि विचारांचे विद्यापीठ होते, असे उद्गार संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी काढले.

येसगाव येथिल न्यु इंग्लिश स्कूलने स्व. शंकरराव कोल्हे यांच्या तुतिय पुण्यस्मतिथी ते जयंती निमित्ताने आठवडाभर व्याखान मालेचे आयोजन केले आहे. या मालेचे पुष्प गुंफताना कोल्हे विद्यार्थांसमोर बोलत होते.

> येसगावची शाळा आणि स्व. कोल्हे यांच्यात अनोखे नाते होते. १०७१ साली येसगांवची शाळा एका मंदीरात सुरू झाली होती आज तिची वाटचाल भव्य इमारतीत झाली असुन सर्व सोयी येथे आहेत. स्व कोल्हे यांनी स्वतःच्या आचरणातुन संपर्कातील व्यक्तींना चांगले संस्कार दिले. ते वेळेच्या बाबतीत अतिशय काटेकोर होते. जीवनात व्यायामाचे महत्व त्यांनी शेवट पर्यंत जपले. ते सतत वाचन करीत असे व नवीन पिढीला त्यातुन माहिती देत.प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर त्यांनी आजारपणावर मात केली.
>
> **– सुमित कोल्हे,** विश्वस्त संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स



याप्रसंगी येसगाव सोसायटीचे चेअरमन सचिन कोल्हे, बाळासाहेब निकोले, किरण गायकवाड, अमोल झावरे, कपिल सुराळकर, उत्तम पाईक, अतुल सुराळकर, सतिष गोसावी, ग्रामस्थ, मुख्याद्यापक रंगनाथ ठाकरे, आदी उपस्थित होते.

कोल्हे म्हणाले की, स्व. कोल्हे उच्च शिक्षित होते. परंतु आपण सर्व सामान्यातील वाटावे यासाठी त्यांनी कायम चा धोतर, शर्ट व टोपी असा पेहराव स्वीकारला. त्यांनी सहकार समजुन घेण्यासाठी एका कारखान्याचे कार्यकारी संचालक म्हणुन काम केले व नंतर संजीवनी कारखाना काढला. त्यांनी शेतकरी केंद्रस्थानी ठेवुन त्यांच्यासाठी अनेक आंदालने केली व मोठ्या राजकिय त्यागाला सामोरे गेले.

# उच्च शिक्षणासाठी तेजस डोंगरेंची ऑक्सफोर्डमध्ये वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**शेवगाव** : तेजस डोंगरे हे माजी सैनिक व यश फाउंडेशन या संस्थेचे सचिव संजय डोंगरे यांचे चिरंजीव असून त्यांचे प्राथमिक शिक्षण आर्मी स्कूल जम्मू, आर्मी स्कूल पुणे, आर्मी स्कूल वेलिंग्टन, केंद्रीय विद्यालय धारचुला (उत्तराखंड), केंद्रीय विद्यालय दिल्ली, आर्मी स्कूल अहिल्यानगर येथून झाले. तर इतर शिक्षण विविध शाळेंमधून घेतले आहे.

या सर्व ऍक्टिव्हिटी करत असताना त्यांनी गेल्या एक वर्षापासून आपले सतत लक्ष ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी मधुन उच्च शिक्षण येण्यासाठी प्रयत्न सुरू केला आणि आपल्या सतत परिश्रमाने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीसाठी लागणाऱ्या सर्व परीक्षा पास केल्या, तसेच ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रवेश पात्रता मिळविली.

तेजसला ऑक्सफर्डमधील सेंट हिलडॉज हे कॉलेज मिळाले आहे. या यशाबद्दल आणि तालुक्याचे भूषण म्हणून तेजस डोंगरे व त्यांच्या पालकांना सामाजिक,राजकीय, शासकीय, शैक्षणिक क्षेत्रातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# महसूल सुनावण्या डिजिटल होणार!

## ना. चंद्रशेखर बावनकुळे; महसूल विभागाचे महत्वाकांक्षी पाऊल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : राज्यभरातील महसूल प्रकरणांवरील सुनावण्या डिजिटल स्वरूपात होणार असून, त्यादिशेने आज प्रत्यय ही पेपरलेस रिव्हिजन व अपील प्रणाली सुरू महसूल विभागाने आज महत्वाकांक्षी पाऊल टाकले. प्रत्यय प्रणालीमुळे फेरफार, तक्रारी, अपील, पुनर्विलकन अर्ज आदी विषय ऑनलाईन पद्धतीने हाताळता येतील. यामुळे नागरिकांना मुंबई किंवा इतर ठिकाणी प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज भासणार नाही. असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

‘प्रत्यय’ प्रणालीचा शुभारंभ आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

> ### नागरिकांची गैरसोय दूर
>
> सध्या राज्यामध्ये महसूल विभागात साधारणपणे दीड लाख अर्ध न्यायिक तर भूमि अभिलेख विभागात सुमारे १५ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. वैचारिक मतभेद यामुळे वादाचे प्रसंग उद्भवतात परिणामी अपिलाची प्रकरणे निर्माण होतात. प्रत्ययमुळे नागरिकांची पायपीट वाचणार असून वेळ, पैशाची बचत होणार आहे.

यावेळी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, प्रधान सचिव संतोष कुमार, जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्यासह महसूल विभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ‘प्रत्यय’ प्रणाली ही शासकीय कामांची सुंदर अनुभूती आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यानी महाराष्ट्राला पारदर्शी आणि गतिमान शासन देण्याचा संकल्प केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून महसूल खात्याने १०० दिवसांत ‘प्रत्यय’ प्रणाली विकसित करण्याचे लक्ष्य पूर्ण केले आहे. या प्रणालीमुळे राज्यभरातील महसूल प्रकरणांवरील सुनावण्या डिजिटल स्वरूपात होतील, परिणामी नागरिकांना मुंबई किंवा इतर ठिकाणी प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज भासणार नाही. राज्यात सध्या महसूल खात्यात अकरा हजार प्रलंबित प्रकरणे आहेत. या प्रकरणांचे त्वरित आणि न्याय्य निवारण करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने निर्णय प्रक्रीया जलद आणि सुटसुटीत करण्याचा विचार शासन करत आहे. आगामी काळात महसूल विभागाच्या सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न सुरू आहे. सरकारची नाममात्र फी भरुन सर्व निर्णय डाऊनलोड करता येणार आहेत.



राज्यातील महसूल विभागाला देशातील पहिल्या क्रमांकावर नेण्याचा मानस आहे. इतर राज्यांसाठी महाराष्ट्राचे महसूल खाते एक आदर्श ठरेल. आगामी काळात व्हिडिओद्वारे महसुली सुनावणी घेण्यासाठी प्रयत्न आहे. संपूर्ण कार्यप्रणाली पेपरलेस होईल यासाठी काम सुरू असून महसूल विभागाचे डेटा सेंटर सुरू करण्याचा मानस आहे.

# मुलींना स्वसंरक्षणाच्या तंत्रांची शिकवण द्या : पीएसआय मेढे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : पालकांनीही आपल्या मुलींना स्वसंरक्षणाच्या तंत्रांची शिकवण द्यावी, नाही म्हणण्याचे महत्त्व समजावून सांगावे आणि त्यांना सतर्क राहण्याचे मार्गदर्शन करावे. यामुळे मुली मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या मजबूत होतील आणि कोणत्याही प्रकारच्या छळाला बळी पडणार नाहीत. तथापि, मुलींच्या सुरक्षिततेबद्दलची समस्या केवळ शाळांपुरती मर्यादित नसून, संपूर्ण समाजाने यासाठी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे, असे मत पोलिस उपनिरीक्षक दीपक मेढे यांनी व्यक्त केले.



माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्या नेतृत्वाखालील व अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोकनगर येथील अशोक फार्मसी व अशोक पॉलिटेक्निक महाविद्यालयात मुलींच्या सुरक्षेसाठी उपयुक्त कायदे, स्वसंरक्षण तंत्र, मोबाईलचा दुरुपयोग या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शक करताना श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक दीपक मेढे बोलत होते.

> सध्याच्या काळात कायदे व अधिकार समजून घेणे गरजेचे असून, योग्य वेळी योग्य पद्धतीने त्याचा वापर करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात मुलींच्या सुरक्षिततेबद्दल अलीकडे अनेक चिंताजनक घटना समोर आल्या आहेत. विशेषतः महाविद्यालय आणि सार्वजनिक ठिकाणी मुलींवरील अत्याचार आणि छेडछाडीच्या घटनांत वाढ झाली आहे.

फार्मसी महाविद्यालयात मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण बरेच वाढलेले असून मुलींचे शिक्षण घेताना तसेच भविष्यात नोकरी करताना कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ टाळण्यासाठी असणारे कायदे, सध्याच्या सामाजिक परिस्थितीत मुलींनी आपले संरक्षण कशी करावे, कायदेशीर बाबीची माहिती कशी असावी तसेच त्यांना उपयोगी ठरू शकणाऱ्या कायद्याची सविस्तर माहिती यावेळी दिली.

यावेळी पॉलिटेक्निकचे प्राचार्य अंजाबापु शिंदे, अशोक फार्मसीचे प्राचार्य प्रसाद कोते आदि महिला शिक्षक व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रमोद राऊत तर सूत्रसंचालन प्रा. वैशाली सुकेकर यांनी केले.

# बाबांचं बोलवणं आलं की आम्ही येतो

**शिर्डी** : बॉलिवूडची ख्यातनाम कोरिओग्रफर आणि दिग्दर्शिका फराह खान साईदर्शनासाठी शिर्डीत आली होती. तिच्याबरोबर प्रसिद्ध अभिनेता राजकुमार रावही सपत्नीक हजर होते. या बॉलिवूड कलाकारांच्याबरोबर अभिनेत्री हुमा कुरेशीनंही साई मंदिरात येऊन बाबांचं दर्शन घेतलं. बाबांचं बोलवणं आलं की आम्ही इथं येतो, अगदी दीर्घकाळापासून शिर्डीत दर्शनासाठी येत असल्याची आठवण यावेळी फराह खानने सांगितली.



> राजकुमार राव सपत्नीक साईचरणी लीन दरवर्षी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला येत असते आणि नेहमी कोणाला ना कोणाला माझा बरोबर घेवून येत असते. यावेळी अभिनेत्री हुमा कुरेशी, अभिनेता राजकुमार रावला सपत्नीक माझ्या बरोबर साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी आज घेवून आले आहे.
>
> **– अभिनेत्री फराह खान**

साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर एक वेगळाच अनुभव मिळतो. मंदिरात साईबाबांच्या मूर्ती समोर उभे राहिल्यानंतर एक वेगळीच अनुभूती मिळते जी शब्दातही सांगत येणार नाही. अनेक दिवसांपासून सहपत्नीक साईबाबांच्या दर्शनासाठी येण्याची इच्छा होती. मात्र येणं होत नव्हतं. आज फराह खाननं सांगितलं की साईबाबांचे बोलावणे आले आहे. आणि अचानक आज साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला आलो आहे.

साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेवून मनाला समाधान मिळालं असून आगामी येणाऱ्या भूल चूक माफ या चित्रपटाच्या यशासाठी ही साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली, असंअभिनेता राजकुमार राव साई दर्शनानंतर सांगितलं.

प्रसिद्ध अभिनेत्री व दिग्दर्शक फराह खान, अभिनेत्री हुमा कुरेशी आणि अभिनेता राजकुमार राव व पत्नी पत्रलेखा पॉल यांनी आज शिर्डीत येवून साई मंदिरात जावून साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांनी फराह खान, हुमा कुरेशी आणि राजकुमार राव यांचा सहपत्नीक साई मूर्ती व शॉल देवून सत्कार केला.

# स्वराज्यरक्षक गड करण्यासाठी लढा उभारणार : खेडेकर

## मराठा जोडो अभिनयान अंतर्गत मराठा सेवा संघ आयोजित जिजाऊ रथयात्रेचे जल्लोषात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : छत्रपती संभाजी महाराजांच्या ९ वर्षाच्या दैदिप्यमान संघर्षमय कारकीर्दीमध्ये मुघलांना सळो की पळो करून सोडले होते. मुघल जरी मुस्लीम असले तरी स्वराज्याचा संघर्ष सत्ता संघर्ष होता तो धार्मिक कधीही नव्हता. मात्र संघाच्या विचाराने काम करणाऱ्या प्रवृत्तींनी किल्ले बहादूरगडचे नाव धर्मवीरगड ठेवून छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याला धार्मिकतेचे स्वरूप दिले आहे.

> बहादुर गडाला स्वराज्यरक्षक गड म्हणून ओळख निर्माण करून देण्यासाठी मोठे आंदोलन उभे करणार आहे.
>
> **– सौरभ खेडेकर** यांनी यावेळी केले.





> जिजाऊ रथ यात्रेसाठी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी घेतलेले परिश्रम व केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल सर्व स्तरातुन कौतुक होत असून संभाजी ब्रिगेडचे विचार व कार्याने प्रेरित होऊन अनेक तरुण वैचारिक मान्यवर संभाजी ब्रिगेडमधे प्रवेश करत आहे.
>
> **– शाम जरे**

संघोट्याची हि बनवेगिरी संभाजी ब्रिगेड उघडी पडणार असून बहादूरगड किल्ल्याचे नामकरण स्वराज्यरक्षक गड असे करण्यासाठी लवकरच मोठे आंदोलन उभा करण्यात येणार असल्याचे वक्तव्य संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रीय महासचिव आणि जिजाऊ रथयात्रेचे अध्यक्ष सौरभ खेडेकर यांनी बहादूरगड येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य स्मारकास अभिवादन प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना केले. यावेळी प्रा. अर्जुनराव तनपुरे, अण्णासाहेब सावंत, जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, राजेंद्र राऊत, राजेश्री शिंदे, स्वाती जाधव, शाम जरे, सचिन काकडे, दिलीप लबडे, इरफान पिरजादे आदी उपस्थित होते.

# वीजबिले वेळेत भरून सहकार्य करा; महावितरणचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महावितरणच्या नाशिक परिमंडलातील घरगुती, औदयोगिक, वाणिज्यिक, पाणीपुरवठा, पथदिवे व ईतर वर्गवारीच्या २ लाख १ हजार ९६१ ग्राहंकांकडे सद्यस्थितीत जवळपास ३२३ कोटी ६९ लाख रुपये थकबाकी असुन, महावितरणची आर्थिक स्थिती गंभीर असल्याने ही थकबाकी वसूली करण्यासाठी थकबाकीदार ग्राहकांचा नियमानुसार वीज पुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरु आहे.

या मोहिमेमध्ये वीज बिलांच्या थकबाकीमुळे अहिल्यानगर मंडलात माहे मार्च २५ महिन्यात २ हजार ४५४ थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून उर्वरित ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याचे काम सुरू आहे.

सदर ग्राहकांना पुन्हा वीज पुरवठा सुरळीत करून घ्यायचा असेल तर त्यांना नियमानुसार एकूण थकबाकीसह पुनर्रजोडणी शुल्क भरावे लागणार आहे. त्यामुळे गैरसोय आणि कटू प्रसंग टाळण्यासाठी थकबाकीदार ग्राहकांनी वीज देयकांचा भरणा वेळेत करून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणच्या अहिल्यानगर मंडलाच्या वतीने करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यांतर्गत घरगुती वर्गवारीतील एकूण १ लाख ७५ हजार ग्राहकांकडे १८ कोटी ८४ लाख, वाणिज्यिक वर्गवारीतील १४ हजार ४३९ ग्राहंकांकडे ४ कोटी २७ लाख रुपये, औद्योगिक वर्गवारीतील १ हजार ७२२ ग्राहकांकडे २ कोटी ६७ लाख रुपये, पथदिवे वर्गवारीतील ३ हजार ७६८ ग्राहकांकडे २१९ कोटी ६३ लाख, पाणीपुरवठा योजनेतील १ हजार ६७४ ग्राहकांकडे ८२ कोटी ७९ लाख रुपये थकबाकी आहे अशी एकूण अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण २ लाख १ हजार ९६१ ग्राहकांकडे ३३२ कोटी ६९ लाख रुपये थकबाकी आहे. पुढील २४ तास अवधीपर्यंत त्या ग्राहकांचा वीज पुरवठा पुर्ववत जोडणी करण्यास लागू शकतो. त्यामुळे गैरसोय आणि कटू प्रसंग टाळण्यासाठी ग्राहकांनी महावितरणच्या वीज देयकांचा भरणा वेळेत करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# जिहादी प्रवृत्त्यांच्या नांग्या ठेचा : सागर बेग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर**: बहुसंख्येच्या बरोबरीने लोकसंख्या झालेल्या व आजही अल्पसंख्यांकाचे सगळे सरकारी फायदे लूटणाऱ्या जिहादी प्रवृत्तीच्या मुसलमानांनी बांगला देशी, रोहिंग्या घुसखोरांच्या जोरावर नागपूर दंगलीत पोलिसांवर चौफेर दगडफेक केली. त्यांच्यावर प्राणघातक शस्त्राने हल्ले करत जखमी केले.

तर काही ठिकाणी महिला पोलिसांच्या अब्रुवर सुद्धा हात टाकण्याची मजल जीहाद्यांची केली ही बाब अत्यंत चिंताजनक आणि महाराष्ट्राची बदनामी करणारी व भारताचे सार्वभौमत्व धोक्यात आणणारी आहे.

अशा जिहादी प्रवृत्त्यांच्या घरावर बुलडोझर चालवून त्यांच्या नांग्या ठेचल्या तरच भविष्यात असे प्रकार थांबतील, अन्यथा पोलिसांवर हल्ले करण्या इतपत गेलेली मजल उद्या सर्वसामान्य नागरिकांच्या जीवावर उठेल, असा समयसूचक सावधगिरीचा सल्ला राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांनी शासनाला दिला आहे.



> ### जिहादी दिसल्यास पोलिसांना कळवा
>
> दिवसेंदिवस या जिहादी चळवळी वाढत चालल्या असून तो अत्यंत चिंतेचा विषय बनला आहे. त्यावर वेळीच लगाम घातला नाहीतर भारताचे सार्वभौमत्व या जिहादी प्रवृत्तीमुळे धोक्यात यायला वेळ लागणार नाही. त्यासाठी पोलिस प्रशासना बरोबरच हिंदूंनी देखील सतर्क राहणे गरजेचे होऊन बसलेले आहे. आपापल्या भागात जागरूक राहून जवळपास कोणी अनोळखी जिहादी दिसल्यास त्याची खबर जवळच्या पोलिस ठाण्यात द्या.
>
> **– सागर बेग**

सकल हिंदू समाज व राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने नागपूर दंगलीत जीहादी प्रवृत्तींनी महाराष्ट्र पोलिसांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध म्हणून आणि पोलिसांच्या मागे खंबीरपणे सकल हिंदू समाज उभा आहे हा संदेश देण्यासाठी महाराष्ट्र पोलीस के सन्मान मे सकल हिंदू समाज मैदान मे या घोषणेचे बॅनर घेत संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये पोलिस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले त्याप्रसंगी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात निवेदन दिल्यानंतर सागर बेग हे सकल हिंदू समाज बांधवां समोर बोलत होते. याप्रसंगी तालुक्यातून बहुसंख्येने सकल हिंदू समाज या मोर्चात सहभागी होऊन पोलिसांचे मनोधर्य वाढवून नागपूर दंगलीत पोलिसांवर हल्ले करणाऱ्या जिहाद्यांवर कडक कारवाईची मागणी करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय श्रीराम संघाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# बसमधून महिला प्रवाशाचे दागिने चोरीला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : महिला प्रवासाच्या पर्समधील अठरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम पंधरा हजार रुपये अज्ञात चोरट्याने प्रवासादरम्यान चोरून नेले आहे. याबाबत महिला प्रवासीचे पती भिमराव माणिकराव ढाकणे (रा. मिरकळा ता. गेवराई, बिड) यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुरुवारी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

> एसटीच्या प्रवाशांना चोरी करून लुटण्याची महिलांची मोठी टोळी कार्यरत आहे. एसटीतून सार्वजनिक प्रवासी प्रवास करता त्यादरम्यान गर्दीचा फायदा घेऊन ह्या महिला चोर प्रवाशांच्या मौल्यवान वस्तूवर डल्ला मारत आहे. कायद्याचा ताक आणि वचन या चोरट्यांवर राहिला नसल्याने वारंवार चोरीच्या घटना वाढत चालले आहे.

एसटीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मौल्यवान वस्तूंची सुरक्षा राहिली नसून प्रवासादरम्यान लक्षणीय अशा चोऱ्यांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. अशा चोरीच्या घटनांमुळे प्रवासी नागरिकात पोलीस विरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.रविवारी (ता.१६) रोजी सकाळी साडे आठ वाजता सुमारास भीमराव ढाकणे व त्यांच्या पत्नी पुष्पा ढाकणे हे पती पत्नी दोघेजण गेवराई बसस्थानक येथुन परभणी ते वल्लभनगर पुणे या एसटी बसमधून अहिल्यानगर येथे प्रवास करीत होतो.



पुष्पा ढाकणे यांनी गळ्यातील सोन्याची पोत व अंगठी ही पर्समध्ये काढुन ठेवली होती. ढाकणे दांपत्य बसमधून प्रवास करताना पाथर्डी ते तिसगाव प्रवासादरम्यान पर्समधील सोन्याची पोत, अंगठी व रोख रक्कम ही पर्समध्ये होती. त्यानंतर करंजी बस स्टँडवर बस असता पर्समधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम पाहणी केली असता ती मिळाली नाही.

# ‘पाणथळ व क्षारयुक्त’साठी बंदिस्त चर योजना राबविणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** पाण्याचा अतिवापर, पाणी निचरा न होणे यामुळे राज्यातील काही भागात पाणथळ व क्षारयुक्त जमिनीचा प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत बंदिस्त चर योजना राबविण्यात येणार असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

सदस्य राहुल कुल यांनी यासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली होती.कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आता जुने झाले आहेत. या बंधाऱ्यांचे बॅरेजेस बंधाऱ्यांमध्ये रूपांतर केले जाईल. यामुळे बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता वाढेल. तसेच बुडीत बंधाऱ्यांचे ही बॅरेजेस बंधाऱ्यांमध्ये रूपांतर केल्यास या बंधाऱ्यातील पाणी साठवण क्षमता वाढेल.पुणे महानगरपालिकेतील पाणी वापरासंदर्भातही महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करण्यात येईल. तसेच पुरंदर तालुक्यातील खोपटेवाडी योजना दुरुस्तीच्या कामाबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल असे जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

राज्याच्या ज्या जिल्हात फार पूर्वीपासून सिंचन सुविधा निर्माण झाल्या. अशा ठिकाणी पाणथळ व जमिन क्षारपड प्रमाण वाढले आहे. अति पाणी वापरामुळे जमीन खालावलेल्या भागात बंदिस्त चर योजना प्रभावी ठरणार असल्याने या योजनेला प्राधान्य देण्यात येणार आहे.

**- राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री**

# अमृतवाहिनीत राज्यस्तरीय अमृत फेस्ट उत्साहात

## आठशे विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांचे मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी तंत्रनिकेतन महाविद्यालयात राज्यस्तरीय अकरावा 'अमृत-फेस्ट-२०२५' कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. या फेस्टमध्ये यावर्षी राज्यभरातील ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमात प्रोजेक्ट कॉम्पिटिशन, कॅड वॉर, कोड वॉर, टिट्यूड टेस्ट, इलेक्ट्रॉनिक सर्किट मेकिंग, हॅकॅथॉन आणि बाईक वर्कशॉप यांसारख्या विविध स्पर्धांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख, प्रा. जे. बी. गुरव, प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्रा. जी. बी. काळे, प्रा. एन. बी. शिंदे, प्रा. एम. डब्ल्यू. इंगोले, प्रा. एन. के. चौधरी, प्रा. जे. के. सातपुते, प्रा. एम.



बी. सातपुते, प्रा. एस. व्ही. गायकवाड आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन 'अमृत-फेस्ट-२०२५'चे मुख्य समन्वयक माहिती तंत्रज्ञान विभागाचे विभागप्रमुख प्रा. एन. के. चौधरी, प्रा. जी. एल. बोराडे आणि प्रा. बी. बी. शिंदे, तसेच विविध समिती समन्वयक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य व्ही. बी. धुमाळ यांनी केले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, विश्वस्त मा. आ. डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त शरयुताई देशमुख, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांनी अभिनंदन केले आणि आयोजन समिती सदस्यांचे कौतुक केले.

# ..त्यांनी माफी न मागितल्यास गुन्हा दाखल करणार : शिंदे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** दि. १९ मार्च २०२५ रोजी श्रीगोंदा शहरात जिजाऊ रथ यात्रा दाखल झाली. रथ यात्रेत जिजाऊंच्या दर्शनासाठी जात असताना संभाजी ब्रिगेडचे जिल्हाअध्यक्ष राजेंद्र परकाळे यांनी माझ्यासह महिलांना रोखले, त्यामुळे परकाळे यांनी माफी मागितली नाही, तर गुन्हा दाखल करणार असल्याचे मीरा शिंदे यांनी सांगितले आहे.

राजमाता जिजाऊ आमच्या प्रेरणास्थान असल्याने तसेच तमाम बहुजन समाजाच्या मनामध्ये जिजाऊ माँसाहेबांविषयी नितांत आदर आहे. याच भावनेतून आम्ही वेगवेगळ्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी महिला जिजाऊ प्रेमी भगिनी रथाचे स्वागत व जिजाऊंच्या दर्शनासाठी गेलो असताना आम्हाला दर्शनापासून रोखणे, ही बाब गंभीर असून महिलांच्या स्वातंत्र्याला गदा आणणारी आहे.

यात्रेचे स्वागत हे जिजाऊंच्या लेकीकडून होणे अपेक्षित असताना महिलांची अडवणूक करणे हा गुन्हा आहे. म्हणून जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी दोन दिवसात माफी मागावी, अन्यथा गुन्हा दाखल करणार आहे, मीरा शिंदे म्हणाल्या.

# पाण्याची उत्पादकता वाढविण्याची गरज : फुलारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासे :** सध्या अस्तित्वात असलेले पाण्याचे स्रोत व प्रकल्पातील पाणीसाठा याला काही मर्यादा असल्याने जल स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात छोटी-मोठी जलसंधारणाची कामे करून पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून पाण्याची उत्पादकता वाढविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले.

नेवासा तालुक्यातील पाथरवाला माध्यमिक विद्यालयात जागतिक जलजागृती दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाचे मुळा पाटबंधारे उपविभाग चिलेखनवाडी यांचे वतीने कार्यकारी अभियंता सायली पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित जलजागृती सप्ताह सांगता कार्यक्रमात शालेय जलसाक्षरता, पाण्याची बचत व संवर्धन काळाची गरज याविषयावर मार्गदर्शन करताना फुलारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अभियंता संदीप पवार होते.माजी सरपंच दत्तात्रय खाटिक, मुख्याध्यापक रमेश खाटीक, सरपंच हरिभाऊ थोरे, शिवनाथ थोरे, राम खाटीक, देविदास खाटीक, संदिप झिपे,पांडुरंग खाटीक, लहू खाटीक, बाबुराव म्हस्के, अध्यापक सुनिल पंडित, चंद्रकांत गुंड, ईस्माइल शेख, चंद्रकांत कचरे, संदिप लिपणे, बाळासाहेब म्हसरूप, शाखा अभियंता जितेंद्र कावले, बिरबल दरवडे, अतुल गायकवाड आदि व्यासपीठावर उपस्थित होते.प्रारंभी विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, पाटबंधारे विभागाचे अधिकारी-कर्मचारी,शेतकरी व ग्रामस्थांनी पाणी आडवा-पाणी जिरवा, पाण्याची बचत-काळाची गरज, 'जल है तो कल है या घोषणा देत गावामधून जल जागृती फेरी काढली.

जलमित्र सुखदेव फुलारी म्हणाले, उपलब्ध पाणी साठा किती आहे आणि पिक,मानुस, पशु-पक्षी यातील कोणत्या घटकासाठी नेमके किती पाणी लागते याची आपल्याला माहिती असेल तर पाण्याचे योग्य नियोजन करणे सोपे होते. पारंपारिक प्रवाही सिंचन पद्धतीत बदल करून सूक्ष्मसिंचनाचा अवलंब केल्यास ४० टक्के पाण्याची बचत होते.

मोजणीदार नितिन लांडे यांनी प्रास्ताविकातून जलदिन व जलजागृती सप्ताहाचा उद्देश विषद केला. कालवा निरीक्षक ससाणे यांनी जलगीत सादर करून उपस्थितांना जलप्रतिज्ञा दिली.

# जातपंची ग्रामसभा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घ्या : सुभेदार सय्यद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** राहुरी तालुक्यातील जातप गावामध्ये गेल्या वर्षभरापासून ग्रामसभा घेण्यात आली नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. त्या अनुषंगाने दि. २१ मार्च २०२५ रोजी तहकूब करण्यात आलेली ग्रामसभा पंचायत समिती अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत इन कॅमेरा घेण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभेदार सय्यद यांनी केली आहे. वंचित नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळावा, सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष करीत असून सत्तेचा गैरवापर करणाऱ्या ग्रामपंचायत सदस्य व अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणीही सय्यद यांनी केली आहे. यावेळी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन ही देण्यात आले. सुभेदार सय्यद, इब्राहिम शेख, मुस्ताक शेख, बाळासाहेब कोळसे, शौकत शेख, फकीरा पठाण, बाळासाहेब खाडे, अतुल कोळसे, अनिल खाडे, सचिन कोळसे, महेश पवार, आकाश कोळसे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरण कंपनीला ‘सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी’ पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महावितरणला काल, नवी दिल्ली येथे केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी म्हणून गौरविण्यात आले.अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते. महावितरणच्या गौरवाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे आभार




मानले तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.महावितरण मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्याला वीज पुरवठा करते. महावितरणचे घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी असे ३ कोटी ११ लाख ग्राहक आहेत. महावितरण देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणारी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेम चेंजर योजना आहे. हा देशातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अनेक दशकांची कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठ्याची मागणी पूर्ण होणार आहे. योजनेची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे.

महावितरणच्या मुख्यालयाच्या छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे नुकतेच उद्घाटन झाले. महावितरणने राज्यात विद्युत वाहनांसाठी ६३ चार्जिंग स्टेशन्स राज्यात उभारली आहेत. पुणे येथे उभारलेल्या विद्युत वाहनांचे चार्जिंग स्टेशन छतावरील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाला जोडून महावितरणने अक्षय्य ऊर्जेच्या आधारे वाहनांचे चार्जिंग करण्यासाठी पाऊल टाकले आहे.

# आधीत चिमुकलीने ठेवला निर्जली रोजा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आधी :** तिचं वय अवघं चार वर्षांचं, तरी ती गुरुवारी पहाटे ५ वाजता ती उठली, तिने भक्तीभावाने नमाज अदा केला आणि संध्याकाळी ६.५० मिनटांपर्यंत तिने ना अन्न मागितले ना पाणी. तब्बल १४ तासांहून अधिक काळ तिने निर्जली रोजा ठेवला आणि मग नमाज अदा करून इफ्तार केला. इतक्या छोट्या वयात असमिरा बशीर शेख हिने ठेवलेल्या या रोजाचे सर्वत्र कौतुक होत आहे.मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना सुरू असून, आज १९ रोजे पूर्ण झाले आहेत. यंदा रमजान ऐन उन्हाळ्यात आल्यामुळे रखरखत्या उन्हात पाण्याचा थेंबही न पिता जवळपास १४ ते १५ तास राहण्याची शक्तीच जणू देव या दिवसांमध्ये देत असल्याची भावना रोजा करणाऱ्यांमध्ये असते. त्यातून त्यांचा रोजा पूर्ण होतो. संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथील असमिराने रोजा ठेवला आणि संपूर्ण १४ तास निर्जली राहिली, त्यामुळे तिचे कौतुक होत आहे.रमजानचा महिना मुस्लिम धर्मियांसाठी सर्वात पवित्र असतो. या पवित्र महिन्याची सुरवात चंद्राच्या दर्शनाने होते. रमजानचा महिना कधी २९ दिवसांचा असतो. तर कधी ३० दिवसांचा असतो. रमजान सुरू होताच मुस्लिम लोकं रोजा सुरू करतात. यावर्षी हा पवित्र महिना १ मार्चपासून सुरू झाला आहे. रोजाची सुरुवात सकाळी सेहरीने होते आणि त्यानंतर संध्याकाळी इफ्तारने रोजा सोडला जातो.

# पाण्याचा योग्य वापर करा : बीडीओ कांबळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाणी बचतीसाठी सरकार महत्त्वाची भूमिका बजावते. त्यासाठी कायदे व धोरण राबवले जात असून अनेक निर्बंध घातले गेलेले आहे. जोपर्यंत नागरिकांमध्ये पाण्याविषयी जनजागृती होणार नाही तोपर्यंत पाण्याचा अपव्यय थांबवणे कठीण आहे. पाणी ही अमूल्य संपत्ती असून त्याचा योग्य प्रकारे वापर करणे आवश्यक आहे, असे आवाहन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांनी केले.

जागतिक जल दिनानिमित्त पाथर्डी शहरालगत असलेल्या वनदेव टेकडी परिसरावर सकाळी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांना पाण्याविषयी जनजागृती मोहीम भारतीय जैन संघटनेच्या वतीने करण्यात आली. त्यावेळी कांबळे बोलत होते. याप्रसंगी विश्वजीत गुगळे, दत्तात्रय रानमल, प्राचार्य जी. पी. ढाकणे, सुभाष केदार, प्रशायन वारे महाराज, अमोल पटवा, राजेंद्र गुगळे, श्रेयस चोरडिया, आनंद लुणावत, अक्षय गांधी, तेजस पटवा, किशोर पारखे, योगेश घोडके, राजेंद्र एडके, आदिनाथ भस्मे, सुनील उगले, दिगंबर बोंडवे, जगन्नाथ शेळके, गणेश पंडित, संजय डोईफोडे, संतोष जाधवर आदी उपस्थित होते.

भारतीय जैन संघटना पाण्यासाठी केवळ अल्पकालीन मदतच करत नाही, तर दीर्घकालीन जल व्यवस्थापनासाठीही प्रयत्नशील आहे. तालुक्याही संघटनेच्या माध्यमातून दुष्काळी भागाला जल समृद्धीद्वारे विकसित करण्याचे काम तालुका भारतीय जैन संघटना करले, असे अमोल पटवा म्हणाले.

# जुने सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यास कृती कार्यक्रम : ना. विखे पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई ;** सिंचनासाठी शेतकऱ्यांना नियमित आणि पुरेसे पाणी मिळावे यासाठी नवीन योजना राबवित असताना जुने प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यात येत आहेत. जुने रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डच्या माध्यमातून कृती कार्यक्रम हाती घेण्यात आला असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत सांगितले.पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील निरा देवधर प्रकल्प संदर्भात सदस्य उत्तमराव जानकर यांनी विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली होती. ना. विखे पाटील म्हणाले की, या प्रकल्पावर जानेवारी २०२५ अखेर १२४३.०४ कोटी इतका खर्च झाला असून २७३३.८० एवढी तरतूद करण्यात आली आहे. नीरा देवधर प्रकल्पासाठी सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात २७४ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या उर्वरित कामांच्या निविदा कार्यवाही हाती घेण्याचे घेतल्या जातील.

*सिंचन क्षेत्र वाढावे आणि शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी शासनाने जलसिंचनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यास प्राधान्य दिले आहे. निरा देवधर प्रकल्पाच्या कामाला गती दिली जाईल.*

***- राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री***

# प्रवरेच्या स्नेहांकितचे डॉ. भाभा परीक्षेत सुयश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूलचा इयत्ता नववीचा विद्यार्थी स्नेहांकित गागरे याने डॉ. होमी भाभा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले, अशी माहिती शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

मुंबई विज्ञान शिक्षक संघटनेमार्फत इयत्ता सहावी आणि नववी वर्गासाठी आयोजित केलेल्या डॉ. होमी भाभा परीक्षेत प्रवरा पब्लिक स्कूलच्या १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यातील इयत्ता नववीच्या स्नेहांकित गागरेने घवघवीत यश संपादन करून दुसऱ्या फेरीसाठी आपली पात्रता निश्चित केली. त्यास शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे,



उपप्राचार्य के. टी. अडसूळ, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी आणि समन्वयक कोमल सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

### विविध मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

प्रवरा संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे पाटील, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे यांनी विशेष अभिनंदन केले.

### विद्यार्थ्यांना विविध संधी उपलब्ध

विज्ञान विषयातील विविध संकल्पना समजणे व विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे हा या परीक्षेमागील मुख्य उद्देश आहे. अशा अनेक परीक्षांचे प्रवरा पब्लिक स्कूलमध्ये नेहमीच आयोजन केले जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संधी उपलब्ध होतात.

# अमृतवाहिनीचे अनेक विद्यार्थी परदेशात उच्च पदावर

## शरयू देशमुख; अमृतवाहिनीच्या स्वामी महालेंची कंपनीत निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** विद्यार्थ्यांच्या उच्च गुणवत्तेबरोबर चांगला निकाल आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी काम करणाऱ्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी करार केला आहे. अमृतवाहिनीच्या आयटी विभागातील स्वामी सुनील महाले यांची टेनेरिटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये दहा लाखांच्या पॅकेजवर निवड झाली आहे.

अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये स्वामी सुनील महाले यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश, डॉ. जे. बी. गुरव, डॉ. नितीन भांड, प्रवीण वाकचौरे, उज्वला सुनील महाले, नामदेव गायकवाड, नामदेव कहांडळ आदी उपस्थित होते.

अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयटी विभागातील स्वामी महाले याची पुणे येथील ते टेनेरिटी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर या पदावर दहा लाखांच्या वार्षिक पॅकेजवर निवड झाली आहे.



### दिग्गज मान्यवरांकडून कौतुक

स्वामी महाले यांच्या निवडीबद्दल माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त शरयुताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम ए वेंकटेश, डॉ. जे. बी. गुरव, विभाग प्रमुख डॉ. बायसा गुंजाळ, यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

### अमृतवाहिनीमुळे मोठे यश

विद्यार्थी दशेमध्येच विविध कंपन्यांच्या इंटरव्ह्यू देण्याचा अनुभव संस्थेमध्ये आला. येणाऱ्या काळासाठी नवीन कोर्सच्या बाबत संस्थेतील शिक्षक व विभाग प्रमुखांनी सातत्याने मार्गदर्शन केले. आई-वडिलांचे कष्ट, प्रामाणिकपणाची शिकवण आपल्यासाठी महत्त्वाची असल्याचे अभियंता स्वामी महाले यांनी म्हटले आहे.

शरयू देशमुख म्हणाल्या की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता जपताना संस्थेने विविध कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारामुळे अनेक विद्यार्थ्यांना नोकरी मिळाल्या आहेत. अनेक विद्यार्थी देशात व परदेशात चांगल्या पदावर व चांगल्या पॅकेजवर काम करत आहे. सध्या आयटी व ए आयचे युग असल्याने या क्षेत्रामध्ये इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या जास्त संधी आहेत. तरीही चांगल्या गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यांमध्ये चांगल्या पॅकेजवर नोकऱ्या मिळत आहेत. स्वामी महालेची निवड ही संस्थेसाठी अभिमानास्पद आहे.

आवाज जागरूक जनतेचा
जनता आवाज
अहिल्यानगर, रविवार, दि.२३ मार्च २०२५

# कॅलिडोस्कोप

भारतातील पहिली सर्वात 'सुपर स्पेशल ट्रेन लाँच' होणार आहे. ही ट्रेन वंदे भारत ट्रेनचे सुपर मॉडेल असणार आहे. ही ट्रेन १६ किंवा १८ नाही तर तब्बल २४ डब्यांची असणार आहे. म्हणजेच एक संपूर्ण गाव या ट्रेनमधून प्रवास करू शकेल. या स्लीपर ट्रेनमध्ये प्रवाशांना जबरदस्त सोई सुविधा मिळणार आहेत. विशेष म्हणेज भारतातील अनेक महत्वाच्या आणि अतिजलद रेल्वे मार्गावर ही २४ डब्यांची वंदे भारत स्लीपर ट्रेन धावणार आहे. सध्या वंदे भारत ही थेट २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन सुरू करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन ही भारतातील शाही ट्रेन असेल. १६ कोचच्या स्लीपर वंदे भारतमध्ये तीन वर्ग आहेत. एसी फर्स्ट, एसी सेकंड आणि एसी थर्ड. त्याची एकूण प्रवासी क्षमता १६९२ इतकी आहे; मात्र, याला आठ कोच जोडल्याने त्याची प्रवासी क्षमता १६९२ इतकी होईल. आतापर्यंत कोणत्याही लक्झरी ट्रेनमध्ये इतकी प्रवासी क्षमता नाही. ही ट्रेन सध्याच्या 'वंदे भारत'पेक्षा अधिक

## एका ट्रेनमधून अख्खं गाव करू शकेल प्रवास!

भारातातील सर्वात जलद आणि आलिशान ट्रेन आहे. भारतीय रेल्वे लवकरच वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करणार आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबई-अहमदाबाद मार्गावर या ट्रेनची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.

पहिल्या १६ डब्यांच्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन'ने १५ जानेवारी रोजी' रिसर्च डिझाईन अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशन' (आरडीएसओ) कडून घेण्यात आलेली कठोर चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. यानंतर आता रेल्वे आधुनिक असणार आहे. या ट्रेनमध्ये एअर कर्टन, क्रॅश बफर, फायर बॅरियर वॉल, पॅडेड बर्थ आणि ऑनबोर्ड वायफाय सारख्या सुविधा मिळणार आहेत. भारतीय रेल्वेने १७ डिसेंबर२०२४ रोजी २४ डब्यांच्या 'वंदे भारत स्लीपर ट्रेन सेट'च्या ५० रेकसाठी 'प्रोपल्शन इलेक्ट्रिक'ची मोठी ऑर्डर दिली आहे. ही ऑर्डर दोन आघाडीच्या भारतीय उत्पादकांना देण्यात आली आहे.



## बुर्ज खलिफाच्या लिफ्टचा वेग रॉकेटइतका!

दुबई म्हटले, की सगळ्याच बाबतीत आकर्षण. अगदी इमारतींपासून ते तेथील लाईफस्टाईलपर्यंत. त्यात दुबईतील बुर्ज खलिफा ही इमारत म्हणजे दुबईची खरी ओळख म्हले, तर चुकीचे ठरणार नाही. बुर्ज खलिफा ही जगातील सगळ्यात उंच इमारत आहे. तसेच बुर्ज खलिफा ही जगातील सर्वात महागडी इमारत म्हणूनही ओळखली जाते. १६३ मजल्यांची बुर्ज खलिफा ही थेट आकाशाला भिडणारी आहे.

बुर्ज खलिफाची उंची एवढी आहे, की ती नव्वद किलोमीटर अंतरावरूनही इमारत दिसते. जगात फक्त या इमारतीचीच नाही तर या इमारतीमधील लिफ्टचीही तेवढीच चर्चा आहे. कारण बुर्ज खलिफामधील लिफ्ट ही जगातील सर्वात वेगवान लिफ्ट मानली जाते. बुर्ज खलिफामधील लिफ्टची खासियत म्हणजे या लिफ्टचा स्पीड. ही लिफ्ट रॉकेटच्या स्पीडने वर जाते, म्हणजे ही लिफ्ट ५९ सेकंदात १२४ थेट माळ्यावर पोहचते. हे जाणून कोणालाही आश्चर्य वाटेल. बुर्ज खलिफामध्ये ५८ लिफ्ट आहे. बुर्ज खलिफामधील लिफ्ट दहा मीटर प्रति सेकंद वेगाने हलते. ताशी ३६ किलोमीटर वेगाने ही लिफ्ट वर जाते. या लिफ्टला इमारतीच्या १२४ व्या मजल्यावर असलेल्या 'अॅट द टॉप' या डेकवर पोहोचण्यासाठी फक्त दोन मिनिटे लागतात. 'अॅट द टॉप' या डेकवरुन दुबई शहराचे डोळे दिपवणारे दृश्य पाहायला मिळते.

ओटिस कंपनीने बुर्ज खलिफामध्ये लिफ्ट बनवल्या आहेत. या लिफ्टमध्ये एकाच वेळी १२ ते १४ लोक जाऊ शकतात. इमारत सेवा तसेच अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी बसवण्यात आलेली लिफ्ट एका वेळी ५५०० किलो सामान वाहून नेऊ शकते. ही जगातील सर्वात उंच सर्व्हिस लिफ्ट आहे. यासह बुर्ज खलिफामधील ही जगातील तिसऱ्या क्रमाकांची वेगवान लिफ्ट आहे. जगात आणखी अशा दोन इमारती आहेत ज्यांचा लिफ्टचा वेग बुर्ज खलिफापेक्षा जास्त आहे. तैवानमध्ये तैपेई नावाची एक इमारत आहे, जिथे जगातील सर्वात वेगवान लिफ्ट आहे. ही इमारत ५०९ मीटर उंच आहे. त्यामध्ये बसवलेल्या लिफ्टचा वेग १०१० मीटर/मिनिट आहे. याचा अर्थ या लिफ्टचा वेग ताशी ६०.६ किलोमीटर आहे. दुसऱ्या क्रमांकावर योकोहोमा लँडमार्क टॉवर येतो. ही इमारत २९६ मीटर उंच आहे. त्यामध्ये बसवलेल्या लिफ्टचा वेग ७५० प्रति मिनिट आहे. म्हणजेच या लिफ्टचा स्पीड ताशी ४५ किमी इतका आहे.

अशा अनेक कारणांमुळेच बुर्ज खलिफा पर्यटकांचे ड्रीम डेस्टिनेशन असते. बुर्ज खलिफा इमारत इस्लामिक स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. बुर्ज खलिफामध्ये २९५७ पार्किंग स्पेस आणि ९०० अपार्टमेंट आणि ३०४ हॉटेल्स आहे. त्यामुळे तुम्ही कधी दुबईला गेलात, तर बुर्ज खलिफा इमारतीच्या सुंदरतेचा आणि या इमारतीमधील लिफ्टचा थ्रीलिंग अनुभव घ्यायला विसरू नका.




## कर्मचारी मिळवण्यासाठी कंपनीचा असाही फंडा!

जर एखाद्या कंपनीला मार्केटमध्ये स्वत:ला प्रस्थापित करायचे असेल, तर त्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कर्मचारी कंपनीशी प्रामाणिक असणे. प्रत्येक कंपनी प्रामाणिक कर्मचाऱ्यांचा शोध घेते आणि अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना लाच देऊन प्रामाणिक बनवतात. असेच पाऊल एका जपानी कंपनीने उचलले आहे. तीने आपल्या नवीन कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी मोफत अल्कोहोल आणि हँगओव्हर रजा दिली आहे.

मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी या कंपनीने एक वेगळी युक्ती आणली आहे, ज्यामध्ये ओसाकामधील एक लहान आयटी कंपनी अलीकडे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आता सोशल मीडियावर यूजर्सही कंपनीच्या या निर्णयावर वेगवेगळ्या गोष्टी सांगत आहेत. कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना मोफत दारू आणि हँगओव्हर रजा देत आहे. कामाच्या दरम्यान दारू पिणे सामान्यतः योग्य मानले जात नाही. कारण दारू प्यायल्यानंतर कोणतीही व्यक्ती शुद्धीत राहत नाही; परंतु ट्रस्ट रिंग कंपनी लिमिटेडच्या बाबतीत असे नाही. ही कंपनी मिडोरीबाशी, ओसाका येथील एक छोटी कंपनी आहे, जी आयटीचे प्रतिनिधित्व करते.

येथे बॉस स्वतः दारू आणतो आणि आपल्या नवीन कर्मचाऱ्यांना सर्व्ह करतो. याशिवाय जर एखाद्या कर्मचाऱ्याने जास्त दारू प्यायली, तर कंपनी त्याला हँगओव्हर रजादेखील देते. याशिवाय कर्मचारी दारूच्या नशेत कामावर उशिरा येऊ शकतात आणि तेही कोणत्याही प्रश्नाशिवाय. 'ऑडिटी सेंट्रल'च्या अहवालानुसार, एका महिला कर्मचाऱ्याने नुकतेच कानसाई टीव्हीला सांगितले, की मी 'हँगओव्हर लीव्ह' युक्ती वापरल्याने मी १२ वाजता कामावर परत जाऊ शकते. आणखी दोन किंवा तीन तास झोपू शकता आणि नंतर स्वच्छ मनाने कामावर परत येऊ शकता. मला वाटते की यामुळे मला अधिक कौशल्य मिळेल.



## हा चहा आहे महाग

चहाबाजांना दर्जेदार चहा लागतो. मस्त कडक चहा प्यायल्याशिवाय त्यांना ताजंतवानं वाटत नाही. म्हणूनच चहा पावडरवर खर्च करण्याची त्यांची तयारी असते. आसाममध्ये चहाचे मळे आहेत. इथे विविध प्रकारच्या आणि दर्जाच्या चहाचं उत्पादन केलं जातं. मध्यंतरी 'गोल्ड टी' या प्रकाराला खूप मोठी किंमत मिळाली. गोल्ड टी प्रकारातल्या एक किलो चहासाठी तब्बल ५० हजार रुपये मोजण्यात आले. गोल्ड टी हा चहाचा दुर्मिळ प्रकार आहे. या चहाची चव खूपच वेगळी असते. ती बराच काळ जिभेवर रेंगाळत रहाते. गेल्या वर्षी या चहाला प्रतिकिलो ३९ हजार इतकी किंमत मिळाली होती.



## मैत्रिणीसाठी लिंगपरिवर्तन

प्रेमात पडलेल्या व्यक्तीला काळ, वेळ, स्थळ कशाचेही भान नसते असं म्हटलं जातं. प्रेमात माणूस वाट्टेल ते करू शकतो. कोणाच्या, कधी प्रेमात पडावं यावरही लोकांचं नियंत्रण नसतं, कोणावरही प्रेम जडू शकतं. एखाद्या महिलेने महिलेशी आणि पुरूषाने पुरूषाशी लग्न केल्याच्या घटनाही हल्ली घडतात. उत्तर प्रदेशच्या मथुरामध्ये एक अशीच वेगळी घटना आहे. तेथे एका मैत्रिणीच्या प्रेमात पडलेल्या तररुणीने तिचं लिंगपरिवर्तनच करून घेतलं. आपली जुनी ओळख पुसून सविता आता ललित बनली आहे. नंतर दोघांनीही पळून जाऊन आर्य समाज मंदिरात जाऊन लग्न केलं आणि आता ते एकत्र रहात आहेत.

जेव्हा जयपूर पोलिस हे पूजा नावाच्या मुलीच्या शोधात मथुरेच्या महावनमध्ये पोहोचले, तेव्हा हा सगळा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी पूजाला परत जयपूरला नेले आणि त्यानंतर ही प्रेमकथा समोर आली. ३१ वर्षीय सविता ही भरतपूरची रहिवासी आहे. एसएससी कोचिंगसाठी ती जयपूरला आली होती. सांगानेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रमेश नावाच्या व्यक्तीच्या घरात ती भाड्याने राहू लागली. रमेशची मुलगी तिच्याच वयाची होती. त्यामुळे दोघींची चांगली मैत्री झाली आणि काही काळातच दोघी एकमेकांच्या जवळ आल्या. कोचिंग संपल्यानंतर सविता भरतपूरला परत गेली; पण त्यानंतरही तिची आणि पूजाची भेट सुरूच राहिली. कालांतराने त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. दोघींनीही एकत्र जगण्याची आणि मरण्याची शपथ घेतली आणि आयुष्यभर



जोडीदार बनून राहण्याचा निर्णय घेतला; मात्र समाजाच्या बंधनांवर मात करण्यासाठी सविताने मोठे पाऊल उचलले आणि लिंग परिवर्तन करून ती सविताची ललित बनली. यानंतर ते दोघेही पती-पत्नी म्हणून एकत्र राहू लागले.

पूजाच्या प्रेमात पडलेल्या सविताने ३१ मे २०२२ रोजी इंदूरमध्ये तिचे लिंग परिवर्तन केलं आणि ती सविताची ललित झाली. यानंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये सविता आणि पूजाचे आर्य समाज वैदिक संस्थान मंडळ, जयपूर येथे लग्न झाले; पण पूजाने हे गुपित तिच्या घरच्यांपासून लपवून ठेवलं होतं; मात्र त्याच दरम्यान, पूजाच्या वडिलांनी एका मुलासोबत तिचं लग्न ठरवलं; पण हे लग्न टाळण्यासाठी पूजाने आपण बीएड करण्यासाठी भरतपूरला जात असल्याचे वडिलांना सांगितले. १० जानेवारी रोजी पूजाने भरतपूरला पोहोचून तिचा मोबाईल बंद केला. कुटुंबीयांनी मुलीचा शोध घेण्याचा खूप प्रयत्न केला; मात्र तिचा काहीच शोध लागला नाही. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनी १४ जानेवारी रोजी जयपूरमधील सांगानेर पोलिस ठाण्यात पूजा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी तिचे मोबाईल लोकेशन ट्रॅक केले असता ते मथुरेच्या महावन पोलिस ठाण्याच्या परिसरात सापडले. जयपूर पोलिसांनी तेथे छापा टाकून पूजा आणि ललितला पकडले. अखेर चौकशीत ललितने सांगितले, की तो महावन येथील फार्मसी कॉलेजमध्ये काम करतो आणि पूजा त्याच्यासोबत पत्नी म्हणून राहत आहे. पूजानेही पोलिसांना स्पष्टपणे सांगितले, की तिला ललितसोबतच राहायचे आहे. दोघेही प्रौढ आहेत त्यामुळे पोलिसांनी त्यांना सोडून दिलं.

## मुलीच्या लग्नात साडेपाचशे कोटी उडवणारा झाला रंक!

काळ खूप बलवान असतो.... राजाचा रंक अन्? रंकाचा राजा कधी होईल हे कुणालाच कळत नाही. सुख-दुःख, विजय-पराजय, श्रीमंती-गरिबी, उदय-पतन अशा भरती ओहोटीसारख्या अनेक घटना मनुष्याच्या आयुष्यात घडत असतात. असेच काहीसे प्रसिद्ध उद्योगपती प्रमोद मित्तल यांच्यासोबत घडले आहे. लेकीच्या लग्नात ५५० कोटी उधणारे प्रमोद मित्तल आता देशोधडीला लागले आहेत. त्यांचे सर्व साम्राज्य धुळीस मिळाले आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत प्रमोद मित्तल यांचे नाव घेतले जात होते. आता त्यांचे अब्जावधींचे साम्राज्य संपुष्टात आले आहे. २०२० मध्ये मित्तल हे दिवाळखोर झाले. त्यानंतर लंडन न्यायालयाने त्यांना दिवाळखोर म्हणून घोषित केले.

प्रमोद मित्तल हे प्रसिद्ध उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांचे बंधू आहेत. प्रमोद मित्तल स्टील इंडस्ट्रीज लिमिटेडचे म्हणजेच आत्ताची जेएसडब्ल्यू स्टील कंपनीचे ते अध्यक्ष राहिले होते. एकेकाळी त्यांची गणना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये केली जायची. आलिशान लाईफस्टाईल आणि खर्चिक सवयींसाठी ते ओळखले जायचे. त्यांचा मुलीच्या लग्न सोहळ्याची आजही चर्चा होते. २०१३ मध्ये त्यांच्या मुलीचा शाही विवाह सोहळा पार पडला. मुलगी सृष्टीच्या हिच्या लग्नात मित्तल यांनी जवळपास ५५० कोटी रुपये खर्च केले होते. जगभरात हा लग्न सोहळा चर्चेचा विषय बनला होता.

दिवाळखोरीनंतर त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी ढासळली की दैनंदिन खर्चासाठी त्यांना कुटुंबावर अवलंबून राहावे लागले. त्यांच्यावर १३० दशलक्ष पौंडांपेक्षा जास्त कर्ज होते. दिल्लीत त्यांची केवळ ४५ पौंड संपत्ती शिल्लक होती. त्यांच्या दिवाळखोरीची कहाणी 'जीआयकेआयएल' या बोस्नियाच्या कोक कंपनीशी जोडलेली आहे. 'जीआयकेआयएल'च्या कर्जाची हमी प्रमोद मित्तल यांनी घेतली होती. हीच चूक त्यांच्या दिवाळखोरीचे कारण ठरली.



'जीआयकेआयएल' कर्ज फेडण्यात अपयशी ठरली. याचा फटका मित्तल यांना बसला. 'जीआयकेआयएल' लंडनस्थित स्टील ट्रेडिंग कंपनीला पैसे देऊ शकली नाही, ज्याचे मित्तल गॅरंटर होते. 'जीआयकेआयएल'सह मित्तल यांना दिवाळखोर घोषित करण्यात आले. अखेर २०१९ प्रमोद मित्तल आणि 'जीआयकेआयएल'च्या इतर दोन अधिकाऱ्यांना बोस्नियातील फसवणुकीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. अटक झाली, तेव्हा मित्तल ६० वर्षांचे होते. यानंतर मित्तल यांचे काय झाले? सध्या ते कुठे आहेत? कोणत्या परिस्थितीत आहेत. याची काहीच माहिती समोर आलेली नाही.

## भ्रष्टाचारात भारत ९६ व्या स्थानावर



'ट्रांसपेरेंसी इंटरनॅशनल'ने २०२४ या संपूर्ण वर्षाचा 'करप्शन परसेप्शन इंडेक्स' (सीपीआय) जाहीर केला आहे. या अहवालात १८० देशांमध्ये भ्रष्टाचाराचा स्तर तपासून त्यांची रँकिंग करण्यात आली आहे. या यादीत भारत ९६व्या स्थानावर, तर पाकिस्तान १३५व्या स्थानावर घसरला आहे. अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. भारतातदेखील अनेक ठिकाणी अधिकाराचा दुरुपयोग करून आर्थिक फायदा मिळवण्यासाठी भ्रष्टाचार होतो, तर कित्येक जण सत्तेचा दुरुपयोग करतात. भ्रष्टाचार हा एक अप्रामाणिकपणा किंवा फौजदारी गुन्हा आहे. 'करप्शन परसेप्शन इंडेक्स' (सीपीआय) हा एक जागतिक अहवाल आहे, जो प्रत्येक देशातील सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या पातळीचे मोजमाप करतो.

देशांना ० ते १०० या दरम्यान गुण दिले जातात. १०० गुण असलेला देश सर्वात स्वच्छ आणि पारदर्शक, तर ० गुण असलेला देश सर्वात भ्रष्ट मानला जातो. या वर्षीच्या अहवालात असे आढळले, की जगभरातील भ्रष्टाचाराची समस्या गंभीर आहे. अनेक देशांचे ५० पेक्षा कमी गुण आहेत. जवळपास ६.८ अब्ज लोक असे देशात राहतात, जिथे भ्रष्टाचाराचा स्तर जास्त आहे. सर्वात कमी भ्रष्टाचार असलेले देश डेन्मार्क असून सलग सातव्या वर्षी सर्वात कमी भ्रष्टाचार असलेला देश ठरला असून त्याला ९० गुण मिळाले आहेत. त्यानंतर फिनलंड (८८), सिंगापूर (८४), न्यूझीलंड (८३), लक्झेंबर्ग (८१), नॉर्वे (८१) आणि स्वित्झर्लंड (८१) हे देश अव्वल स्थानांवर आहेत. या यादीत दक्षिण सुदान (८ गुण) हा सर्वात भ्रष्ट देश ठरला असून तो १८०व्या स्थानावर आहे. त्यानंतर सोमालिया (१७९), व्हेनेझुएला (१७८), सीरिया (१७७) आणि येमेन, लिबिया, एरिट्रिया आणि इक्वेटोरियल गिनी (१७३) आहेत. चीन ७६व्या स्थानावर, भारत ९६व्या स्थानावर, श्रीलंका १२१व्या स्थानावर, पाकिस्तान:१३५व्या स्थानावर, बांगलादेश १५१व्या स्थानावर, तर अफगाणिस्तान १६५व्या स्थानावर आहे.

भारताची रँकिंग पाकिस्तानपेक्षा खूप चांगली असली तरी भ्रष्टाचार कमी करण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. शासनाने आणि नागरिकांनी मिळून पारदर्शकता आणि प्रामाणिक कारभारावर भर द्यायला हवा.

## त्यांनी पाळली सुसर

अमेरिकेतल्या पेंसिलवेनियाचे रहिवासी जोए हेनी यांच्याकडे पाळीव सुसर आहे. ती जोए यांच्या काळजाचा तुकडा आहे. 'वॅली' असं या सुसरीचं नाव असून तिच्यामुळे जोए नैराश्यातून बाहेर पडले. ६५ वर्षांचे जोए वॅलीमुळे तणावमुक्त आयुष्य जगत आहेत. या सुसरीला आपल्यासोबत ठेवण्यासाठी त्यांनी डॉक्टरांची मदत घेतली. शिवाय 'इमोशनल सपोर्ट ॲनिमल' म्हणून तिची नोंदणीही करून घेतली आहे. पाच फूट लांबीची ही सुसर चक्क मांजरांनाही घाबरते. जोए आजारी पडल्यावर सरपटत त्यांच्या जवळ जाते. आपल्यावर सर्वांनी प्रेम करावं असं वॅलीला वाटतं. तिला जोएला मिठी मारायला खूप आवडतं. वॅली ही सुसर चार वर्षांची आहे.



वॅली काही वर्षांनी १६ फुटांची होईल. मात्र जोए यांना याबाबत काळजी वाटत नाही. जोए यांनी वॅलीला मृत्यूच्या दाढेतून वाचवलं होतं. जोए वॅलीला घेऊन बागेत आणि खरेदीलाही जातात. सुसरीला बघून लोक खूप घाबरतात. वॅली काहीच करत नसल्याचं सांगावं लागतं.